- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,२८,७०० /-
✔ २२ कॅरेट : १,१२,३५० /-
✔ चांदी : १,७८,३००/-

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर
संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 Mail Id : sinhvanivrutta@gmail.com दिनांक : बुधवार, २५ नोव्हेंबर २०२६ Epaper : epaper.sinhvani.com पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३४५ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

पंजाबमध्ये भाजप-अकाली दलाची पुन्हा युती



वृत्तसंस्था, पंजाब

पंजाबच्या राजकारणात मोठी घडामोड घडली आहे. तब्बल ६ वर्षांनंतर भारतीय जनता पक्ष आणि शिरोमणी अकाली दल पुन्हा एकदा एकत्र आले आहेत. २०२७ मध्ये होणाऱ्या पंजाब विधानसभा निवडणुकीत दोन्ही पक्ष युती करून निवडणूक लढवणार आहेत. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि अकाली दलाचे प्रमुख सुखबीर सिंग बादल यांनी पत्रकार परिषद घेत या युतीची अधिकृत घोषणा केली. विशेष म्हणजे, गुरु नानक देव यांच्या जयंतीचा मुहूर्त साधत दोन्ही पक्षांनी पुन्हा एकत्र येण्याचा निर्णय जाहीर केला.

या युतीची घोषणा करताना अमित शाह यांनी अकाली दलासोबतच्या जुन्या मैत्रीचा उल्लेख केला. ते म्हणाले, "अकाली दल हा आमचा जुना मित्रपक्ष आहे. आम्ही यापूर्वी एकत्र अनेक निवडणुका लढवल्या आहेत. त्यात कधी विजय मिळवला, तर कधी पराभवाचा सामना केला. आज हे नाते पुन्हा एकदा जोडले जात आहे, जुन्या मित्राचं स्वागत." अमित शाह यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आदल्या दिवशी सुखबीर सिंग बादल यांच्याशी संवाद साधला होता. अकाली दलाच्या पुनरागमनामुळे एनडीए पुन्हा पूर्ण झाली असल्याचे पंतप्रधानांनी म्हटल्याचेही त्यांनी सांगितले. भाजप आणि अकाली दलाची युती ही हिंदू-शीख ऐक्याचे प्रतीक असल्याचे शाह यांनी नमूद केले.युतीची घोषणा करताना अमित शाह यांनी पंजाबमधील प्रमुख प्रश्नांवरही भाष्य केले.

राज्यातील अमली पदार्थांचे व्यसन, भ्रष्टाचार आणि राष्ट्रवादी शक्तींना बळकट करण्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. अमित शाह म्हणाले, "पंजाबमधून अमली पदार्थांचे व्यसन समूळ नष्ट करणे, भ्रष्टाचार संपवणे आणि राष्ट्रवादी शक्तींना बळकट करणे हे आमचे ध्येय आहे. सध्याच्या सरकारने आणि अरविंद केजरीवाल यांनी तीन महिन्यांत पंजाबला अमली पदार्थमुक्त करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, ते पूर्ण झाले नाही. राहुल गांधी यांनीही २०१७ मध्ये असेच आश्वासन दिले होते. आम्ही ३१ डिसेंबर २०२९ पर्यंत पंजाबला अमली पदार्थमुक्त करण्याचे वचन देतो."

सहा वर्षांपूर्वी का तुटली होती भाजप-अकाली दलाची युती ?

भाजप आणि शिरोमणी अकाली दल यांची मैत्री अनेक वर्षांपासूनची आहे. दोन्ही पक्षांनी एकत्र निवडणुका लढवल्या असून पंजाबमध्ये सत्ताही स्थापन केली आहे. मात्र, सप्टेंबर २०२० मध्ये केंद्र सरकारने आणलेल्या तीन कृषी कायद्यांविरोधात शेतकरी आंदोलन सुरू झाले. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर अकाली दलाने भाजपसोबतची युती तोडण्याचा निर्णय घेतला. अकाली दलाच्या नेत्या हरसिमरत कौर बादल यांनी केंद्रीय मंत्रिमंडळातून राजीनामा दिला आणि त्यानंतर पक्षाने एनडीएतून बाहेर पडण्याची घोषणा केली. आता सहा वर्षांनंतर दोन्ही पक्षांनी पुन्हा हातमिळवणी केली आहे.

भाजप-अकाली दलाने यापूर्वी किती वेळा एकत्र निवडणूक लढवली ?

भाजप आणि अकाली दल यांनी १९९७, २००२, २००७, २०१२ आणि २०१७ या विधानसभा निवडणुका एकत्र लढवल्या होत्या. यापैकी १९९७, २००७ आणि २०१२ मध्ये या युतीने पंजाबमध्ये सरकार स्थापन केले होते.

२०२२ च्या विधानसभा निवडणुकीत मात्र दोन्ही पक्ष स्वतंत्रपणे मैदानात उतरले होते. त्यावेळी भाजपला ६.६ टक्के, तर अकाली दलाला १८ टक्के मते मिळाली होती. दुसरीकडे, आम आदमी पक्षाने (आप) ४२ टक्के मते मिळवत ९२ जागांवर विजय मिळवला. काँग्रेसला २३ टक्के मते आणि १९ जागा मिळाल्या. अकाली दलाला केवळ ३, तर भाजपला २ जागांवर समाधान मानावे लागले.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीतही दोन्ही पक्ष स्वतंत्रपणे लढले. या निवडणुकीत भाजपला १८ टक्के, तर अकाली दलाला १३.१ टक्के मते मिळाली.

शोरमा खाल्ल्याने ३४ जणांना विषबाधा

वृत्तसंस्था, ठाणे/ भिवंडी

भिवंडी शहरातील वंजारपट्टी नाका परिसरात शोरमा खाल्ल्याने १७ जणांना विषबाधा झाल्याची धक्कादायक घटना समोर आली होती. या घटनेतील रुग्णांचा आकडा वाढून ३४ वर पोहोचला आहे. वंजारपट्टी नाका परिसरातील ए.के. शोरमा दुकानातून शोरमा खाल्ल्यानंतर अनेकांना उलटी, जुलाब, मळमळ आणि तापाचा त्रास सुरू झाला. यामध्ये लहान मुलांचाही समावेश असून, सर्व रुग्णांना उपचारासाठी भिवंडी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. रुग्णांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

घटनेची माहिती मिळताच भिवंडी महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त गिरीश गोष्टेकर, बीट निरीक्षक हनुमान म्हात्रे,आरोग्य अधिकारी फैसल तातली, आरोग्य पथक आणि निजामपूर पोलीस ठाण्याचे अधिकारी तसेच अन्न औषधी विभागाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले .

दरम्यान विषबाधाच्या या घटनेनंतर महापालिका एक्शन मोडवर आली आणि भिवंडी महापालिकेने संबंधित ए.के. शोरमा दुकानावर तोडक कारवाई करत शोरमा टपरी जप्त केली असून, निजामपूर पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस तपास करीत आहेत.

दरम्यान, भिवंडीत यापूर्वी देखील शोरमा आणि पिज्झा खाल्ल्याने विषबाधेची मोठी घटना घडली होती. जून महिन्यात खंडू पाडा परिसरातील फेमस शोरमा दुकानातून शोरमा आणि पिज्झा खाल्ल्याने तब्बल १०७ जणांना विषबाधा झाली होती. वारंवार अशा घटना घडत असल्याने उघड्यावर अन्नविक्री करणाऱ्या दुकानदारांवर तसेच शोरमा आणि पिज्झा विक्री करणाऱ्या दुकानांवर अन्न व औषध प्रशासन आणि भिवंडी महानगरपालिका ठोस कारवाई करणार का? नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या अशा दुकानांवर कायमस्वरूपी नियंत्रण आणण्यासाठी प्रशासन कोणती पावले उचलणार, हा प्रश्न आता उपस्थित होत आहे. भिवंडी महापालिकेचे सहायक आयुक्त गिरीश गोष्टेकर यांनी वंजारपट्टी नाका वॉर्ड क्रमांक १ येथे शोरमा खाऊन अनेकांना विषबाधा झाल्याची माहिती समजल्याचं म्हटलं. अतिक्रमण विभागाचं पथक घटनास्थळी पोहोचलं होतं.

थोडक्यात

१६ डिसेंबरला महामार्ग ताब्यात घेण्याचा आवामी लीगचा इशारा

ढाका : गेल्या दोन वर्षांहून अधिक काळ भारतात आश्रयाला असलेल्या बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांनी येत्या १६ डिसेंबर रोजी मायदेशी परतण्याची अधिकृत घोषणा केल्यानंतर बांगलादेशातील राजकीय वातावरण प्रचंड तापले आहे. १६ डिसेंबर हा दिवस बांगलादेशात १९७१ च्या मुक्तिसंग्रामातील विजयाचा वर्धापनदिन म्हणून साजरा केला जातो. हसीना यांनी पहिल्यांदाच आपल्या वापसीची निश्चित तारीख जाहीर केल्याने देशात कायदेशीर आणि राजकीय संघर्ष शिगेला पोहोचला आहे.

शेख हसीना यांच्या प्रवक्त्यांनी मंगळवारी त्यांच्या परतीच्या तारखेवर शिक्कामोर्तब केल्यानंतर, त्यांच्या आवामी लीग पक्षाने फेसबुक पोस्टद्वारे मोठी घोषणा केली आहे. शेख हसीना यांचा उल्लेख जननेत्या असा करत आवामी लीगने जाहीर केले आहे की, १६ डिसेंबर रोजी देशातील महामार्गांवर जनतेचा ताबा असेल. तसेच, हसीना यांनी बांगलादेश सरकारकडे आपले रद्द केलेली आवश्यक कागदपत्रे परत देण्याची आणि मायदेशी परतण्यासाठी सरकारी विमान कंपनी बिमान बांगलादेश एअरलाइन्सच्या विमानाची व्यवस्था करण्याची मागणी केली आहे.

तेजोमय प्रकाशाने उजळले 'गडमंदिर'



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

त्रिपुरारी पौर्णिमा उत्सव रामटेक येथे मोठ्या उत्साहात साजरा होतो. राज्यभरातील रामभक्त हा अनुभव 'याची देही, याची डोळा' अनुभवण्यासाठी येथे येत असतात. त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त रात्री १२ वाजता जल्लोषात उत्सव साजरा केला जातो. यंदाही मोठ्या प्रमाणात भक्तमंडळींची मांदियाळी रामटेक येथे बघायली मिळाली. रामटेक गडमंदिरावर केलेली आकर्षक रोषणाई कित्येक दुरून उत्सवाचे रंग उधळत होते. गडमंदिरावर दिवाळीच साजरी करण्यात येते. **(छायाचित्र : दै. सिंहवाणी वृत्त)**

वाळू चोरीच्या साम्राज्यावर ईडीने पकड केली घट्ट

१६.२३ कोटींची मालमत्ता जप्त, २५ हून अधिक व्यक्तींच्या नेटवर्कची चौकशी सुरू, बेनामी मालमत्ता आणि राजकीय संबंधांबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर/ नागपूर

वाळूची कथित चोरी आणि बनावट ट्रान्झिट पास (टीपी) वापरून अवैध वाहतूक केल्याप्रकरणी अंमलबारी संचालनालयाने (ईडी) नरेंद्र पिंपळे यांची १६.२३ कोटी रुपयांची जंगम आणि स्थावर मालमत्ता जप्त केली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या मालमत्तेचे सध्याचे बाजारमूल्य ५० कोटी रुपयांपेक्षा जास्त असू शकते. या कारवाईमुळे नागपूर आणि आसपासच्या जिल्ह्यांमध्ये कार्यरत असलेल्या वाळू माफियांमध्ये घबराट पसरली आहे.

तपासाअंती, नागपूर आणि आसपासच्या जिल्ह्यांमध्ये बनावट इलेक्ट्रॉनिक ट्रान्झिट पासचा वापर करून अवैध वाळू उत्खनन आणि वाहतूक केली जात होती. या नेटवर्कमुळे सरकारी महसुलाचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाल्याचा आरोप आहे. तत्कालीन पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या कार्यकाळात नोंदवलेल्या प्रकरणांच्या आधारे ईडीने मनी लाँडरिंगचा तपास सुरू केला. या तपासादरम्यान रामनगर येथील रहिवासी नरेंद्र पिंपळे यांचे नाव समोर आले. झडतीदरम्यान जप्त केलेली कागदपत्रे, डिजिटल उपकरणे, बँक खाती आणि इतर मालमत्तेची तपासणी केल्यानंतर ही जप्तीची कारवाई सुरू करण्यात आली.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या नेटवर्कमध्ये अमित राय, शरद राय, उत्तम कापसे, प्रफुल्ल यांचा समावेश असल्याची माहिती आहे



सूत्रांनुसार, अमित राय, शरद राय, उत्तम कापसे, प्रफुल्ल कापसे, झुबेर सिद्दिकी आणि गुड्डू खोरगडे यांच्यासह या नेटवर्कमधील २५ हून अधिक व्यक्तींच्या भूमिकेची चौकशी केली जात आहे. असा आरोप आहे की, या नेटवर्कमध्ये सामील असलेल्या काहींनी त्यांच्या गैरमार्गाने मिळवलेल्या पैशातून महागड्या गाड्या, जमीन आणि आलिशान फार्महाऊस यांसारखी मालमत्ता मिळवली आहे. यापैकी काही मालमत्ता इतरांच्या नावावर खरेदी करण्यात आल्याचाही संशय आहे.

गुड्डू खोरगडे यांची महागडी लँड रोव्हर कार आणि मोहापा रोडवरील गोव्याच्या थीमवर आधारित फार्महाऊसचीही चर्चा होत आहे. यांची किंमत २५ कोटी रुपयांपेक्षा जास्त असल्याचे म्हटले जाते. या मालमत्तांची खरी मालकी आणि उत्पन्नाच्या स्रोताची चौकशी करणे अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. या प्रकरणात नरेंद्र पिंपळे,उत्तम कापसे यांचे सत्ताधारी पक्षातील काही नेत्यांशी जवळचे संबंध असल्याचा दावाही समोर आला आहे. तपासावर प्रभाव टाकण्याचे कथित प्रयत्न आणि राजकीय आश्रयाबद्दलही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. तथापि, या दाव्यांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही.

ईडीच्या कारवाईनंतर, बेनामी मालमत्ता, आलिशान वाहने आणि या नेटवर्कशी संबंधित इतरांच्या भूमिकेची चौकशी अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. येत्या काही दिवसांत आणखी नावे समोर येऊ शकतात. ९ जानेवारी २०२६ ला सावनेर शहरासह पाटनसावंगी, खापा येथील रेती व्यवसायीकांवर ईडीच्या अधिकार्यांनी एकच धाड टाकत त्यांच्या घरे दारे,शेती, फार्महाऊस, रिसॉर्ट आदीसह बँक खाते ,दागदागिने आदिंची कसुन चौकशी केली होती त्याच्या परिणाम आता हळूहळू दिसू लागले आहेत

हितसंबंधी व हस्तकांत चिंतेचे वातावरण

अवैध रेती व्यवसायीकांसोबत संबंध ठेवत त्यांच्यासोबत उठण्या-बसण्याला आपले स्टेटस समझणारे त्यांचे हितचिंतक, हितसंबंधी व त्यांचे हस्तकांत आता चिंतेचे वातावरण निर्माण होत असुन ईडीची तिरडी नजर आपल्याकडे तर वळणार नाही ना या भितीने अनेकांनी त्यांच्याकडे फिरून पाहणे सुद्धा बंद केल्याचे दिसून येत आहे

गोंदियात शिक्षकच बनला भक्षक; अल्पवयीन विद्यार्थिनींसोबत अश्लील चाळे केल्याचा आरोप!

सावरी जिल्हा परिषद शाळेतील धक्कादायक प्रकार; संतप्त ग्रामस्थांचा शाळेत आक्रोश, शिक्षक पोलिसांच्या ताब्यात

दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया

विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे देऊन त्यांचे उज्ज्वल भविष्य घडविण्याची जबाबदारी असलेल्या शिक्षकानेच विद्यार्थिनींसोबत गैरवर्तन केल्याचा धक्कादायक प्रकार गोंदिया तालुक्यातील सावरी येथील जिल्हा परिषद शाळेत उघडकीस आला आहे. सहावी व सातवीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या अल्पवयीन विद्यार्थिनींसोबत अश्लील चाळे केल्याचा तसेच त्यांच्या शरीराच्या विविध भागांना अयोग्य पद्धतीने स्पर्श केल्याचा गंभीर आरोप संबंधित शिक्षकावर करण्यात आला आहे. या घटनेमुळे संपूर्ण गावात संतापाची लाट उसळली असून संतप्त पालक आणि ग्रामस्थांनी शाळेत धाव घेत शिक्षकाला जाब विचारला.

परिस्थिती तणावपूर्ण झाल्यानंतर रावणवाडी पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून संबंधित



शिक्षकाला ताब्यात घेतले. नागोराव कटरे (वय ५५) असे आरोपी शिक्षकाचे नाव आहे.

सावरी येथील जिल्हा परिषद शाळेत सहावी आणि सातवीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींसोबत संबंधित शिक्षक गैरवर्तन करीत असल्याचा आरोप आहे. शिक्षकाकडून शरीराच्या विविध भागांना अयोग्य पद्धतीने स्पर्श करून त्रास दिला जात असल्याची माहिती विद्यार्थिनींनी आपल्या पालकांना दिली. शाळेसारख्या सुरक्षित आणि पवित्र शैक्षणिक ठिकाणी आपल्या पाल्यांसोबत असा प्रकार घडत असल्याचे समजताच पालकांना मोठा धक्का बसला.

विद्यार्थिनींच्या तक्रारीनंतर संतप्त पालकांनी थेट शाळा गाठून संबंधित शिक्षकाला जाब विचारला. या घटनेची माहिती गावात पसरताच मोठ्या संख्येने ग्रामस्थ शाळेच्या परिसरात जमा झाले. ग्रामस्थांमध्ये प्रचंड संताप निर्माण झाला होता. काही ग्रामस्थांनी शिक्षकाला मारहाण करण्याची भूमिका घेतल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच रावणवाडी पोलीस ठाण्याचे निरीक्षक रामदास शेवते यांच्यासह पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणत संबंधित शिक्षकाला ताब्यात घेऊन रावणवाडी पोलीस ठाण्यात आणले. या प्रकरणी पोलिसांनी शिक्षकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

शिक्षकाच्या निलंबनाची ग्रामस्थांची मागणी

या गंभीर प्रकारामुळे पालकवर्गात भीती आणि संतापाचे वातावरण आहे. विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला असून संबंधित शिक्षकाला तात्काळ निलंबित करावे, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांनी केली आहे. प्रशासनाने याप्रकरणी त्वरित कठोर कारवाई न केल्यास गावकरी एकजुटीने तीव्र आंदोलन छेडतील, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे. या घटनेमुळे शाळांमधील विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा आणि शिक्षकांच्या जबाबदारीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

संपादकीय लेखणीतून...

पुस्तकाची फाडाफाड

एखाद्या पुस्तकातील विचार हे एखाद्याला प्रेरक आणि एखाद्याला पीडा देणारे असू शकतील. एखाद्या पुस्तकातील मांडणीला एखाद्याचा आक्षेप असू शकतो, त्यावर हरकतीदेखील असू शकतात; मात्र मी असे मानणाऱ्यांपैकी आहे की, पुस्तक आणि साहित्यनिर्मिती समाजाला प्रगल्भ करीत असते त्यामुळे पुस्तक फाडणे हे मला मान्य नाही. मी कधी पुस्तक फाडले नाही किंवा कधी पंतप्रधानांचा निर्णय फाडलेला नाही, असे सडेतोड वक्तव्य करत मंत्री आशिष शेलार यांनी शिंदे सेनेला अप्रत्यक्ष टोला लगावला आहे. पुण्यातील पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमात रविवारी त्यांनी हे वक्तव्य केले. शिवसेनेच्या प्रवक्त्यांनी अलिकडेच पत्रकार परिषद घेऊन काँग्रेसच्या माजी राष्ट्रीय अध्यक्षा तथा ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांच्या पुस्तकाची पाने फाडली होती. सोनिया गांधी यांच्या पुस्तकात स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा अपमान करण्यात आल्याचा आरोप करत शिवसेनेच्या प्रवक्त्यांनी या पुस्तकाची पाने फाडली होती त्यामुळे शेलार यांच्या या वक्तव्यावर आता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून काय प्रतिक्रिया दिली जाते ते पाहणे महत्त्वाचे आहे. या पुस्तकातून स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा अपमान झाल्याचे तसेच मराठी साहित्य व अस्मितेचा अवमान झाल्याचा दावा करत शिंदे शिवसेनेच्या ६ प्रवक्त्यांनी जाहीरपणे पुस्तकाची प्रत फाडली होती तसेच सावरकरांचा अपमान करणाऱ्या पुस्तकाची प्रत कुणी हसतमुखाने कशी स्वीकारू शकते? असा सवाल उपस्थित करत उद्धव ठाकरे यांच्यावरही निशाणा साधला होता.

या संपूर्ण घटनेवर भाष्य करताना रविवारी पत्रकारांशी बोलताना शेलार यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आणि पुस्तक फाडणे आपल्याला मुळीच मान्य नसून आपण कधीही पुस्तक फाडलेले नाही, असे स्पष्ट केले. एखादा पुस्तकातील मूळ गाभ्याशी आणि विचारांशी आपण सहमत असो वा नसो; पण पुस्तकनिर्मिती हे सुसंस्कृतपणाचे लक्षण असून समाजाने पुस्तकांवर प्रेम करणारा दृष्टिकोन ठेवला पाहिजे, असे मत त्यांनी मांडले. पुस्तकात मांडलेल्या विषयांवर किंवा भूमिकेवर आंदोलन करण्याचा लोकशाही अधिकार असला तरी साहित्यनिर्मितीच्या संदर्भात सहकायार्ची भूमिका घेतली पाहिजे, असे सांगत त्यांनी पुस्तकातील विचार कोणासाठी प्रेरक तर कोणासाठी पीडादायक ठरू शकतात आणि त्यावर आक्षेप किंवा हरकतीही घेतल्या जाऊ शकतात, हे अधोरेखित केले; मात्र पुस्तक आणि साहित्यनिर्मिती समाजाला प्रगल्भ बनवण्याचे आणि माणसाची जडणघडण करण्याचे महत्त्वाचे कार्य करत असल्याचे स्पष्ट करत पुस्तक फाडणे ही आपली संस्कृती नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. सोनिया गांधी यांनी लिहिलेल्या 'बिलॉन्गिंग : अ जर्नी ऑफ लव्ह' या आत्मचरित्राच्या पुस्तकातील काही मजकुरावर शिवसेनेच्या ६ प्रवक्त्यांनी आक्षेप घेत निषेध नोंदवला होता तसेच त्यांनी सोनिया गांधींवर टीका केली होती. शिवसेनेचे प्रवक्ते एवढ्यावरच थांबले नाहीत त्यांनी सोनिया गांधी यांच्या पुस्तकातील पानेदेखील फाडली होती. पुस्तकातील काही फोटो फाडत असताना शिवसेनेच्या प्रवक्त्या शायना एनसी यांनी बाळासाहेब ठाकरे आणि मणिशंकर अय्यर यांचा एकत्रित फोटो फाडला होता.

या फोटोवरून नवा राजकीय वाद पेटला होता. विरोधकांनी या मुद्यावरून रान उठवले तेव्हा एकनाथ शिंदे यांनी शायना एनसी यांनी मणिशंकर अय्यर यांचा फोटो फाडल्याचा दावा केला होता. शायना एनसी यादेखील तसेच म्हणाल्या होत्या; पण वाद वाढल्यानंतर शायना यांनी जाहीरपणे माफी मागितली होती. स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा अवमान झाल्याचा मुद्दा पुढे करत शिवसेना ठाकरे गटाला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न शिंदे सेना करणार होती; मात्र, त्याच वेळी शिंदे सेनेकडून चूक झाली. शिंदे सेनेच्या प्रवक्त्या शायना एनसी यांच्याकडून फोटो फाडताना बाळासाहेब ठाकरे यांचाही फोटो फाडला गेला. भाजप आणि आरएसएस हे असभ्य, लोभी, जातीवादी आणि पुरुषप्रधान मानसिकतेचे आहेत. त्यांना भारतीय अध्यात्मिक व धार्मिक परंपराबद्दल अजिबात समज नाही, अशी घणाघाती टीका काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी रविवारी केली. आपल्या आईच्या पुस्तक प्रकाशनावेळी राहुल गांधी यांनी केलेल्या विधानावरून त्यांच्यावर टीका झाली होती.

भारत-नेपाळ संबंधांचे नवे पर्व

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल वर्धा



दक्षिण आशियातील भूराजकीय समीकरणांमध्ये भारत आणि नेपाळ यांच्यातील संबंधांना अनन्यसाधारण ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि धोरणात्मक महत्त्व आहे. मार्च २०२६ मध्ये नेपाळमधील तरुणांच्या 'जेन-झी' आंदोलनानंतर सत्तेत आलेल्या नव्या नेतृत्वाकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले होते. पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर बालेंद्र शाह ऊर्फ बालेन शाह यांनी आपल्या पहिल्याच द्विपक्षीय परदेश दौऱ्यासाठी भारताची निवड करून एक अत्यंत महत्त्वाचा राजनैतिक संदेश दिला आहे. त्यांचे पूर्वसुरी के. पी. शर्मा ओली यांनी आपल्या पहिल्या परदेश दौऱ्यासाठी चीनला प्राधान्य दिले होते, परंतु शाह यांनी ही परंपरा मोडीत काढत नवी दिल्लीशी संवाद साधण्याला प्रथम पसंती दिली आहे. नेपाळच्या राजकारणात उदयास आलेल्या या नव्या पिढीच्या नेतृत्वाशी थेट संवाद प्रस्थापित करून गेल्या काही वर्षांत दोन्ही देशांमध्ये निर्माण झालेली विश्वासाची दरी भरून काढण्याची सुवर्णसंधी भारतासमोरही या निमित्ताने चालून आली आहे.

या ऐतिहासिक आणि धोरणात्मकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या दौऱ्यासाठी बालेंद्र शाह २२ ते २३ नोव्हेंबर २०२६ दरम्यान नवी दिल्लीत दाखल झाले आहेत. या दौऱ्याचे गांभीर्य त्यांच्यासोबत आलेल्या उच्चस्तरीय शिष्टमंडळावरून स्पष्ट होते. त्यांच्या अधिकृत सरकारी शिष्टमंडळात अर्थमंत्री स्वर्णिम वागळे आणि परराष्ट्रमंत्री शिशिर खनाल यांच्यासह एकूण ३४ सदस्यांचा समावेश आहे. याशिवाय नेपाळमध्ये भारतीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी आणि आर्थिक सहकार्यालां चालना देण्यासाठी ५२ उद्योजकांचे एक स्वतंत्र शिष्टमंडळ 'नेपाळ-भारत व्यापार मंच' या उपक्रमात सहभागी होत आहे. २३ नोव्हेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत होणारी द्विपक्षीय बैठक या दौऱ्याचा मुख्य केंद्रबिंदू असून, शाह हे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांचीही भेट घेणार आहेत. या चर्चांमधून दोन्ही देशांच्या भावी संबंधांना नवी दिशा देणारा 'संयुक्त दृष्टीकोन दस्तऐवज' आणि अनेक महत्त्वपूर्ण करारांवर शिक्कामोर्तब होण्याची दाट शक्यता आहे.

दोन्ही देशांमधील मैत्रीपूर्ण संबंधांच्या पार्श्वभूमीवर सुमारे १,८८० किलोमीटर लांबीच्या सीमेवरील वाद हा या दौऱ्यातील सर्वात संवेदनशील आणि कळीचा मुद्दा मानला जात आहे. कालापानी, लिपुलेख आणि लिंपियाधुरा तसेच सुस्ता या सीमाभागांवर नेपाळ १९१६ च्या सुगौली कराराचा आधार घेत आपला हक्क सांगतो, तर भारताने हा दावा सातत्याने फेटाळून लावला आहे. जून २०२० मध्ये नेपाळने घटनादुरुस्ती करून हे वादग्रस्त भाग आपल्या अधिकृत राजकीय नकाशात समाविष्ट केल्यापासून दोन्ही देशांमधील तणावात मोठी भर पडली होती. खुद्द बालेंद्र शाह यांची या संदर्भातील पूर्वीची भूमिका देखील चर्चेत राहिली आहे; २०२३ मध्ये काठमांडूचे महापौर असताना भारताच्या नवीन संसदेतील 'अखंड भारत' नकाशाला प्रत्युत्तर म्हणून त्यांनी आपल्या कार्यालयात 'ग्रेटर नेपाळ'चा नकाशा लावला होता. एवढेच नव्हे तर तीन मे २०२६ रोजी शाह यांच्या नेतृत्वाखालील सरकारने भारत आणि चीनदरम्यान लिपुलेखमार्गे कैलास मानसरोवर यात्रा सुरू करण्यावर अधिकृत आक्षेप नोंदवला होता, ज्यामुळे या दौऱ्याकडे विशेष कुतूहलाने पाहिले जात आहे.

अशा तणावपूर्ण पार्श्वभूमीवर या दौऱ्यातून सीमा वादावर काही ठोस तोडगा निघेल का, हा प्रश्न राजनैतिक वर्तुळात प्रकर्षाने विचारला जात आहे. आंतरराष्ट्रीय संबंधांचे अभ्यासक आणि माजी राजदूतांच्या मते, इतक्या गुंतागुंतीच्या आणि भावनिक सीमा वादावर एका बैठकीत किंवा रातोरात कायमस्वरूपी तोडगा निघण्याची शक्यता अत्यंत कमी आहे. तथापि, नेपाळमधील धोरणकर्ते आणि तज्ज्ञांनी शाह यांच्यावर असा दबाव टाकला आहे की हा विषय केवळ प्रलंबित न ठेवता ऐतिहासिक पुराव्यांवर आधारित नियमित राजनैतिक चर्चा पुन्हा सुरू करणे गरजेचे आहे. यासोबतच कालापानी आणि सुस्ता हे दोन वादग्रस्त भाग तूर्तास बाजूला ठेवून, उर्वरित सुमारे ९८ टक्के सीमाभागाचे तयार झालेले 'स्ट्रिप मॅप्स' म्हणजेच रेषात्मक नकाशे अधिकृतपणे मंजूर करण्यावर दोन्ही बाजूंकडून भर दिला जाऊ शकतो. सद्यस्थितीत दोन्ही देशांचा कल सीमा वाद अत्यंत संवेदनशीलपणे व संयमाने हाताळून, आपले लक्ष आर्थिक विकास आणि परस्पर सहकार्यावर केंद्रित करण्याकडे असल्याचे स्पष्ट दिसून येते.

सीमा वादापलीकडे जाऊन आर्थिक पुनर्बांधणी, दळणवळण आणि ऊर्जा क्षेत्रातील सहकार्य हा या दौऱ्याचा खरा गाभा ठरणार आहे. ऑगस्ट २०२६ मध्ये नेपाळच्या भोटेकोशी भागात आलेल्या भीषण पुरात रस्ते, पूल आणि पायाभूत सुविधांची मोठी हानी झाली होती; तिच्या पुनर्बांधणीसाठी भारताकडून सुमारे दोन अब्ज डॉलरचे भरीव आर्थिक मदतीचे पॅकेज जाहीर होण्याची शक्यता आहे. यासोबतच नेपाळमधील भैरहवा आणि पोखरा येथील आंतरराष्ट्रीय विमानतळांना व्यावसायिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी २०१४ पासून प्रलंबित असलेल्या अतिरिक्त हवाई प्रवेश मार्गांच्या मागणीवरही सकारात्मक चर्चा अपेक्षित आहे.

दोन्ही देशांतील सांस्कृतिक व व्यापारी दुवा मजबूत करण्यासाठी अयोध्या ते जनकपूर या सीमापार रेल्वे सेवेला हिरवा झेंडा दाखवला जाणार असून, पनौती येथील नेपाळ पोलीस अकादमी आणि भैरहवा एकात्मिक तपासणी नाक्याचे उद्घाटन तसेच लोअर अरुण जलविद्युत प्रकल्प, दोधारा चांदणी तपासणी नाका आणि सिलिगुडी-झापा पेट्रोलियम पाइपलाइनचे भूमिपूजन प्रस्तावित आहे. १९९६ च्या महाकाली करारानुसार प्रलंबित असलेल्या पंचेश्वर जलविद्युत प्रकल्पातील खर्च वाटपावर २५:७५ किंवा ३०:७० या प्रमाणात सहमती जवळ आली असली तरी पाणी वाटपाचा प्रश्न आणि नेपाळची वाढती व्यापार तूट हे मुद्दे अद्याप चर्चेच्या केंद्रस्थानी आहेत; एकूणच हा दौरा भारत-नेपाळ संबंधांना केवळ पारंपरिक मैत्रीपुरते मर्यादित न ठेवता एका व्यावहारिक आणि विकासकेंद्रित युगात नेणारा ठरेल यात शंका नाही.

- ९५६१५९४३०६

लग्न ठरवताना मुलींची मतं विचारात घ्या, त्यांच्या निर्णयांना प्राधान्य द्या!

सौ. मनीषा विशाल सोन्नेकर/सोनकांबळे

मेघा काकू संध्याकाळचा चहा घेत झोपाळ्यावर बसलेल्या. तेवढ्यात फोन वाजला. "हॅलो१२, बोला कोण बोलतंय"?. "अगं मी बोलतेय, प्रतिमा". "अगं बाई प्रती तू. अगं काय हे खूप दिवसांनी फोन केलास?". "अगं हो कामानिमित्त फोन केलाय". "हो बोलना". "मग, कुठेय रितू?". "अगं, गेलीये ती ऑफिसला". "बरं ऐक. रितूसाठी स्थळ बघितलंय. खूप छान आहे. उगीच वेळ नको दवडायला. म्हणून म्हणते. लवकरात लवकर पाहण्याचा काय तो कार्यक्रम उरकून घेऊयात आणि बोलाचाली करूयात. काय जमतंय ना?". "अगं हो हो. जमतंय कि. बरं, मुलगा काय करतो?. आणि घर-दार वगैरे". "मुलगा मोठ्या कंपनीत कामाला आहे. आणि घरदार वगैरे सगळं काही छान आहे. आणि आपली रितू पण चांगल्या कंपनीत, चांगल्या पगारावर आहेच कि". "बरं बरं. मी यांच्याशी बोलून लगेच उद्या तुला सांगते".

थोड्या वेळात रघु काका घरी आले. आणि लगेच मेघा काकूंनी त्या स्थळाबद्दल काकांना सगळं कांही सांगितलं. तरी काका म्हणाले, "आपली मुलगी नोकरीला आहे. उगाच तिच्या लग्नाचा घाट घालत तिला त्रास नको अडकवूस. अगं स्थळ काय येत जात राहतील. पण येवढ्यात तिच्या लग्नाची नको घाई. आत्ता कुठे पोरगी नोकरीला लागली. थोडंसं निवांत जगू दे तिला". "आहो ! काही काय बोलताय?. कळतंय का तुम्हाला?. मुलगा मोठ्या कंपनीत कामाला आहे. अजून काय पाहिजे. आपली पोर सुखात राहील. ते कांही नाही हं. मला हेच स्थळ करायचंय आपल्या रितूसाठी. बस्स" !. तेवढ्यात रितू ऑफिसहून घरी आलेली. "काय आईबाबा?. एवढी काय चर्चा करताय"?. काकू म्हणाल्या, "रितू बाळा, तुज्यासाठी खूप चांगलं स्थळ आलंय. कोणतीही उणीदुणी न काढता पटकन स्थळाला हो म्हणू टाक. अगं, मुलगा मोठ्या कंपनीत कामाला आहे. घर दार चांगलं आहे. अजून काय पाहिजे"?. "आई, अगं काय हे?. तुला एकदाही असं वाटलं नाही का?. कि या आलेल्या स्थळाबद्दल माज्याशी सविस्तर बोलावं. माझं मत विचारात घ्यावं. मी काय म्हणते? ते शांतपणे ऐकून घ्यावं. आई अगं आत्ता कुठे नोकरीला लागले मी. मला नोकरीचा थोडातरी आनंद घेऊदेत. शेवटी लग्न तर करायचंच आहे ना. मग थोडं थांबना. नको एवढी घाई".

मेघा काकू त्यांचा हट्ट काही सोडल्या नाही. आणि त्या हट्टापुढे रितूला नमतं घेत लग्नासाठी "हो" म्हणावं लागलं. लगेच दोन दिवसांनी प्रतिमा काकूंनी मुलाकडच्या मंडळींना घेऊन आले. रितूला हे मान्य नसतानाही तिला या स्थळासाठी तयार व्हावं लागलं. बघण्याचा कार्यक्रम झाला. आणि अवघ्या पंधरा दिवसात लग्न झालं. लग्नाला महिना झाला. रितू नवी नवरी. नव्या घरात, नव्या माणसात स्वतःला छानरित्या बसवत होती. सगळ्यांशी मस्तशी जुळवून घेत होती. पण हळूहळू रितूच्या नवऱ्याचं दारूचं व्यसन तिच्यासमोर उघडं पडलं. रोज रात्री ऑफिसहून घरी उशिरा येणे, तिच्यावर जोर-जबरदस्ती करणे, छोट्या छोट्या गोष्टींवरून वाद करणे. या कुरबुरी सुरु झाल्या.

घर, घरातील काम, पाहुणे - राऊळे, ऑफिस. रितू हे सगळं नेटाने अगदी छान सांभाळत होती. पण, नवऱ्याचं दारूचं व्यसन, उशिरा घरी येणे, पैशाचा अपव्यय यामुळे मात्र रितू फार फिकीरीत होती. आईला सांगितलं असता. "प्रतिमाने मला मुलाच्या या सवर्यीबद्दल काहीच सांगितलं नाही. मुलगा मोठ्या कंपनीत कामाला आहे एवढाच विचार केला गं मी. अगं, बाळा तु सुखात राहशील म्हणून मी घाई केली. चुकलं गं रितू माझं". स्वावलंबी, नोकरी करणारी, पैसे कमवणारी रितू. या सगळ्या गोष्टींमुळे पुरती खचली होती. नवऱ्याशी शांतपणे बोलण्याचा तिचा एकटीचा प्रयत्न तिने करून पाहिला पण...!. रितू या सगळ्यामध्ये विनाकारण भरडल्या जात होती.

शेवटी आईबाबांना सगळं कांही सविस्तर बोलून तिने एकदाचा काय तो निर्णय घेतला. लग्नाला अवघे सात ते आठ महिने झाले होते. आणि एवढ्या महिन्यात तिने तो मानसिक त्रास सहन केला होता ज्याची तिने तिच्या नवऱ्याकडून अपेक्षाच केली नव्हती. "मी म्हणाले होते ना आई, नको येवढ्यात लग्न. पण नाही तुम्ही कुणीच नाही ऐकलं माझं". शेवटी रितू नवऱ्यापासून कायमची वेगळी झाली. वय वर्षे अवघे २६. एवढ्या वयात रितूने लग्न, तडजोड, संयम, त्रास, वाद आणि टोकाचाच पण योग्य निर्णय या सगळ्या गोष्टी फेस केल्या.

आपण म्हणतो कि, चला स्थळ चांगलं आहे. तर पोरीच्या लग्नाचा उडवून टाकुया बार. आपली मुलगी सुंदर आहे, सुशिक्षित आहे, कमवती आहे, स्वावलंबी आहे. या गोष्टींना समोर ठेऊन तिच्या बाबतीत घरातील मोठे, बुजुर्ग लोक निर्णय घेतात आणि मोकळे होतात. पण, आपण जिचं लग्न ठरवतोय, तिला तिथे नांदायचंय. मग एकदातरी तिला खुलेपणाने सविस्तर बोलावं, त्या अमुक अमुक स्थळाबद्दल तिला सगळं कांही सांगावं. आणि शेवटी यावर तुझा निर्णय, तुझं मत सांग. तु जर हो म्हणशील तरंच आम्ही पुढची बोलणी करतो. घरातील मोठे, बुजुर्ग माणसे जेव्हा मुलीला दिलासा देत आणि मनमोकळेपणाने असं बोलतात तेव्हा प्रत्येक मुलगी निश्चिन्त होऊन तिचा योग्य निर्णय घरच्यांसमोर ठेवते, तिचं मत मांडते.

आता मुलींनाही त्यांचं भलं खूप चांगलं कळतंय. त्या कुणाबरोबर लग्न करायचं?, तो मुलगा त्यांच्या योग्य आहे का?. हा योग्य निर्णय घेण्याइतपत तर त्या नक्कीच सुविचारी झाल्या आहेत. कानावर आलेल्या स्थळाबाबतीत घाईघाईत निर्णय न घेता आपण जिचं लग्न ठरवतोय तिच्याशी एकदा मनमोकळेपणाने बोला, तिच्या लग्नाबाबतीत तिला मत मांडण्याचा परिपूर्ण अधिकार द्या. तरंच ती निश्चिन्तपणे तुमच्याशी अगदी सहजरीत्या बोलू शकेल. लग्नानंतर निर्माण होणाऱ्या अडचणी, संसारीक वाद, वैचारिक मतभेद या सगळ्या गोष्टीला तिला सामोरे जावं लागतं. म्हणून लग्नाआधीच या सर्व गोष्टींचा पुरेपूर खुलासा करा. लग्नानंतर ती सुखात राहू शकेल. म्हणून लग्न ठरवताना मुलींची मतं विचारात घ्या. आणि त्यांच्या मतांना प्राधान्य द्या. तरंच लग्न यशस्वी ठरतील.

- देगलूर
९९६००२८८९९

वेलिंग्टन कसोटी : विजयाची संधी हातात असूनही भारताने लढाई संपण्यापूर्वीच हत्यार टाकले!

१५ षटके बाकी असताना सामना अनिर्णित ठेवण्याचा निर्णय; चुकीची संघनिवड, बचावात्मक नेतृत्व आणि गौतम गंभीरच्या धोरणांवर गंभीर प्रश्नचिन्ह!

जिंकण्याची प्रबळ संधी असलेला सामना अनिर्णित ठेवणे, हे केवळ दोन गुणांच्या गणितातील नुकसान नाही, तर भारतीय कसोटी क्रिकेटच्या मानसिकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी घटना आहे. वेलिंग्टनच्या मैदानावर भारताने फलंदाजीतील सामर्थ्य दाखवले, पहिल्या डावात धावांचा डोंगर उभा केला; मात्र निर्णायक क्षणी विजयासाठी आवश्यक असलेली आक्रमक मानसिकता दाखवण्यात संघ अपयशी ठरला. न्यूझीलंडच्या फलंदाजांनी किल्ला लढवला हे खरे; पण त्यांना शेवटपर्यंत झुंज देण्यास भाग पाडण्याऐवजी सामना संपवण्याची घाई भारतीय संघाने का केली, हा खरा प्रश्न आहे.

१९ ते २३ नोव्हेंबरदरम्यान झालेल्या या पहिल्या कसोटीत भारताने ७२० धावांवर ९ बाद घोषित केले, तर न्यूझीलंडने पहिल्या डावात ३६८ धावा केल्या. दुसऱ्या डावात न्यूझीलंडने २३९ धावांपर्यंत मजल मारली आणि सामना अनिर्णित राहिला. भारताला विजयासाठी आणखी पाच बळींची आवश्यकता होती. तरीही १५ षटके शिल्लक असताना दोन्ही संघांनी हस्तादोलन करून सामना संपवला.

फलंदाजीचा विक्रम, पण विजयाचे गणित कुठे चुकले?

डॉ. दत्ता विघावे, क्रिकेट समीक्षक

भारताच्या फलंदाजांनी या सामन्यात आपली क्षमता सिद्ध केली. के. एल. राहुलने १३६, ऋषभ पंतने १२८, शुभमन गिलने ९८, यशस्वी जैस्वालने ८५, देवदत्त पडिक्कलने ८० आणि ध्रुव जुरेलने ७८ धावा केल्या. पहिल्या सात भागीदा?यांनी प्रत्येकी पन्नासपेक्षा अधिक धावांचे योगदान दिले. भारताची ७२० धावांची मजल ही सामन्यातील सर्वात मोठी जमेची बाजू होती.

मात्र, एवढ्या मोठ्या धावसंख्येनंतर विजय मिळवण्यासाठी गोलंदाजांना पुरेसा वेळ आणि प्रभावी रणनीती देणे आवश्यक होते. भारताने पहिल्या डावात न्यूझीलंडचे पाच बळी अवघ्या ७० धावांत मिळवले होते. त्यानंतर हेन्री निकोल्स (१७५*) आणि ग्लेन फिलिप्स (११८) यांनी डाव सावरला. पहिल्या डावातील हा अनुभव भारतीय संघाने दुसऱ्या डावाच्या नियोजनात लक्षात घ्यायला हवा होता. पहिल्या डावात निकोल्सचा झेल देवदत्त पडिक्कलने डावाच्या सुरुवातीलाच सोडला. तो जर घेतला असता तर सामना भारत तिसऱ्या किंवा चौथ्या दिवशीच जिंकला असता.

न्यूझीलंडच्या फलंदाजांना एकदा स्थिरावण्याची संधी मिळाल्यानंतर त्यांना बाद करणे किती कठीण ठरू शकते, याची कल्पना भारतीय संघाला होती. तरीही दुसऱ्या डावात गोलंदाजीचे पर्याय, क्षेत्ररक्षणातील आक्रमकता आणि सतत बदलणारी रणनीती यांचा अपेक्षित परिणाम दिसला नाही.

१५ षटके बाकी असताना विजयाचा प्रयत्न का सोडला?

या सामन्यातील सर्वात खटकणारा निर्णय म्हणजे १५ षटके शिल्लक असताना सामना अनिर्णित ठेवण्यास संमती देणे. न्यूझीलंडची दुसऱ्या डावातील धावसंख्या २३९/५ होती. डॅरिल मिचेल ४९ धावांवर आणि ग्लेन फिलिप्स २६ धावांवर खेळत होते. भारताला पाच बळी मिळवायचे होते. खेळपट्टी गोलंदाजांना फारशी मदत करत नव्हती, हे मान्य; परंतु कसोटी क्रिकेटमध्ये विजयाची संधी शेवटच्या चेंडूपर्यंत शोधणे हीच खरी कसोटी असते. कमिान उरलेल्या १५ षटकांत प्रयत्न सुरू ठेवता आले असते. वेगवान गोलंदाजांच्या थकव्याचा मुद्दा महत्त्वाचा होता; मात्र त्यासाठी फिरकी गोलंदाज, पयार्यी गोलंदाज आणि वेगळे क्षेत्ररक्षणाचे डावपेच वापरता आले असते. रविचंद्रन अश्विननेही भारताने उर्वरित षटके खेळवून पाहायला हवी होती, अशी भूमिका मांडली आहे.

प्रश्न असा आहे की, पाच बळी मिळवण्याची संधी कठीण होती म्हणून प्रयत्नच थांबवायचे का? विजयाची खात्री नव्हती, पण विजयाची शक्यता पूर्णपणे संपलीही नव्हती. मग भारतीय संघाने स्वतःहून सामना संपवण्याची घाई का केली? कसोटी क्रिकेटमध्ये अनिर्णित सामना स्वीकारणे गैर नाही; पण विजयासाठी संधी शिल्लक असताना परिस्थितीचा मुकाबला करण्याऐवजी माघार घेणे निश्चितच चर्चेचा विषय ठरतो. लढण्यापूर्वीच हत्यार ठेवणे हे नक्की मर्द लढवय्याचे लक्षण नव्हे.

संघनिवडीतच विजयाचा पाया कमकुवत?

या सामन्यातील दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे संघनिवड. मोहम्मद सिराजसारख्या अनुभवी आणि परदेशी परिस्थितीत प्रभावी ठरलेल्या वेगवान गोलंदाजाला अंतिम अकरामध्ये स्थान न देण्याचा निर्णय अनेकांच्या भुवया उंचावणारा होता. कर्णधार शुभमन गिलनेही सिराजला वगळणे कठीण असल्याचे मान्य केले; मात्र सध्याचा फॉर्म आणि गोलंदाजांची कामगिरी पाहून निर्णय घेतल्याचे सांगितले. पण प्रश्न केवळ सिराजला वगळण्याचा नाही. पाच दिवसांच्या कसोटीत प्रतिस्पर्धाचे वीस बळी घेण्यासाठी गोलंदाजीची विविधता, अनुभव, ताजेपणा आणि परिस्थितीनुसार बदल करण्याची क्षमता आवश्यक असते. वेगवान गोलंदाजांवर अतिप्रमाणात अवलंबून राहावे आणि नंतर त्यांच्याच थकव्याचे कारण देऊन सामना संपवावा, हे नियोजनातील विसंगतीचे लक्षण नाही काय? अंतिम अकरा निवडताना केवळ खेळाडूंचा सध्याचा फॉर्म नव्हे, तर सामन्याची परिस्थिती, खेळपट्टीचा स्वभाव, प्रतिस्पर्ध्यांची फलंदाजी आणि विजयासाठी आवश्यक असलेली गोलंदाजीची ताकद यांचाही विचार झाला पाहिजे. वेलिंग्टनमध्ये या सर्व बाबींचा पुरेसा समतोल साधला गेला का, याचे उत्तर संघव्यवस्थापनाने द्यायला हवे.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com / ई-पेपर : epaper.sinhvani.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

पाणीटंचाईवर मात करण्यासाठी तुमसरात प्रशासनाचा कृती आराखडा!

जलसंधारण, तलाव खोलीकरण, शेततळे व अवैध पाणी उपशावर नियंत्रणासाठी जनसंवाद; दोन दिवसांत गावनिहाय नियोजनाचे तहसीलदारांचे निर्देश, आमदार राजू कारेमोरे यांचे गावपातळीवरील समन्वयाचे आवाहन; भूजल पुनर्भरण व पाणीसाठा वाढविण्यासाठी विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर

दै. सिंहवाणी वृत्त, तुमसर

भविष्यातील संभाव्य दुष्काळी परिस्थिती आणि पाणीटंचाईचे संकट लक्षात घेऊन जलस्रोतांचे संवर्धन, भूजल पुनर्भरण आणि गावपातळीवर ठोस उपाययोजना राबविण्यासाठी तुमसर तहसील कार्यालयात विशेष जनसंवाद आयोजित करण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागांतर्गत तहसील कार्यालय, तुमसर व पंचायत समिती, तुमसर यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार, २३ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता आयोजित या जनसंवादात जलसंधारण व पाणी व्यवस्थापनाच्या विविध उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीचा संभाव्य परिणाम लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचे नियोजन, सार्वजनिक पाणीपुरवठा स्रोतांची दुरुस्ती, भूजल पुनर्भरण, शेततळ्यांची निर्मिती, तलाव खोलीकरण, मृद व जलसंधारणाची कामे तसेच



उन्हाळी धान पिकासाठी पाण्याचे नियोजन या विषयांना प्राधान्य देण्यात आले. गावपातळीवरील पाणीटंचाईची वस्तुस्थिती, शेतकऱ्यांच्या समस्या आणि आवश्यक विकासकामांची माहिती या संवादातून जाणून घेण्यात आली.

अवैध पाणी उपशावर नियंत्रणाचा निर्णय

गाव तलाव व पाझर तलावांमधील अवैध पाणी उपसा रोखण्यासाठी प्रशासनाने ठोस भूमिका घेतली. सार्वजनिक पाणीपुरवठा करणाऱ्या स्रोतांच्या ५०० मीटर परिसरात अवैध पाणी उपसा होऊ नये, यासाठी ग्रामपंचायत स्तरावर संबंधितांची माहिती संकलित करून आवश्यक कारवाई करण्याबाबत तालुकास्तरीय समितीने निर्णय घेतला. पाण्याचा उपलब्ध साठा जपणे आणि पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देणे ही काळाची गरज असल्याचे अधोरेखित करण्यात आले.

गाळमुक्त धरण, गाळमुक्त शिवार व तलाव खोलीकरणावर भर

गाळमुक्त धरण-गाळमुक्त शिवार अभियानांतर्गत तलावांमधील गाळ काढून तो शेतकऱ्यांना उपलब्ध करून देणे, तलावांचे खोलीकरण करून जलसाठवण क्षमता वाढविणे, भूजल पुनर्भरणासाठी आवश्यक कामे हाती घेणे तसेच मृदूसंधारण व जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर राबविण्याबाबत चर्चा करण्यात आली. व्ही.बी. जी. रामजी योजनेंतर्गत गावपातळीवर आवश्यक कामे तसेच वन विभागांतर्गत घ्यावयाच्या कामांचे नियोजन करून त्यांना कृती आराखड्यात समाविष्ट करण्यावर भर देण्यात आला.

दोन दिवसांत गावनिहाय नियोजन करण्याचे निर्देश

विविध शासकीय यंत्रणा व ग्रामपंचायतींनी आपसी समन्वय राखून दोन दिवसांच्या आत आवश्यक कामांचा आराखडा तयार करावा आणि तो ग्रामसभेच्या मंजुरीसाठी सादर करावा, असे निर्देश तालुकास्तरीय समितीचे अध्यक्ष तथा तहसीलदार उपेश अंबादे यांनी दिले. योजनांचा लाभ प्रत्यक्ष गावांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासन, ग्रामपंचायत व संबंधित विभागांनी समन्वयाने कार्यवाही करावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

आमदार राजू कारेमोरे यांचे मार्गदर्शन

जनसंवादात आमदार राजू भाऊ कारेमोरे यांनी मार्गदर्शन करत दुष्काळ व पाणीटंचाई निवारणासाठी गावपातळीवर प्रभावी नियोजन आणि सर्व विभागांमध्ये आपसी समन्वय आवश्यक असल्याचे सांगितले. स्थानिक गरजा लक्षात घेऊन कामांचे प्राधान्य निश्चित करावे आणि जलसंधारणाच्या उपाय योजनांना लोकसहभागातून गती द्यावी, अशी सूचना त्यांनी केली. या जनसंवादाला उपविभागीय अधिकारी गणेश दिघे, तहसीलदार उपेश अंबादे, गटविकास अधिकारी नंदकिशोर वालेकर, तालुका कृषी अधिकारी, वनपरिक्षेत्र अधिकारी, पंचायत समितीचे अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपक्रम राबविण्याच पाणीटंचाई निवारणासाठी दीर्घकालीन नियोजन, जलस्रोतांचे संवर्धन, भूजल पुनर्भरण आणि लोक सहभागातून जलसंधारणाची कामे प्रभावीपणे राबविण्याच्या दिशेने हा जनसंवाद महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

थोडक्यात

तोंडली येथील मंडई महोत्सवाच्या इतिहासात प्रथमच खासदारांनी लावली हजेरी!



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू:मौदा

दरवर्षीप्रमाणे वंदाही कोदामेंढी- अरोली जि प व रामटेक लोकसभा निर्वाचन क्षेत्रातील गट ग्रा पं तोंडली अंतर्गत येणाऱ्या तोंडली येथे दोन दिवसीय २१ व २२ नोव्हेंबरला मंडई महोत्सवाचे आयोजन थाटात करण्यात आले होते. गावातील मंडई महोत्सवाच्या इतिहासात प्रथमच खासदारांनी हजेरी लावली आहे. रामटेक लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्यामकुमार बर्वे तोंडली येथील मंडई महोत्सवाला उपस्थित होते. मंडई महोत्सवाच्या माध्यमातून जातीय सलोखा अबाधित राखला जातो व गावातील विविध गटातील आपापसातील मतभेद दूर होऊन एकात्मतेची भावना जोपासली जाते, असे मार्गदर्शन करताना खासदार शामकुमार बर्वे यांनी सांगितले. त्यामुळे गावागावात दरवर्षी मंडई महोत्सवाचे आयोजन नियमित होत रहावे, यानिमित्ताने रोजगार निर्मितीही होत असते, असेही ते पुढे म्हणाले. याप्रसंगी माजी उपनगराध्यक्ष रमेश कारेमोरे, सामाजिक कार्यकर्ते अभय रेड्डी, माजी सरपंच मधुकर सेलोकर, गट ग्रा पं तोंडली ग्रा पं सदस्या आकांक्षा योगेश बुरडे,माजी ग्रा पं सदस्य रामकृष्ण आस्वले, आयोजक प्रकाश सपाटे, अध्यक्ष भास्कर ठवकर, उपाध्यक्ष प्रवीण सेलोकर, सचिव शेखर गाढवे, सहसाचिव मुरलीधर कनोजे,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रमोद अतकरी, जीवन उके , योगेश बुरडे, राजु शेंडे, महादेव मोहतुरे, परमेश्वर तिजारे,कैलाश तिजारे,गौरीशंकर तिजारे , मंडळाचे सर्व सदस्य , काँग्रेस चे पदाधिकारी व समस्त तोंडली ग्रामवासी उपस्थित होते.

चाचेर येथे आज त्रिपुरी पौर्णिमा निमित्त भव्य कीर्तन व महाप्रसाद

दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू:मौदा

मागील १०० वर्षाच्या परंपरेनुसार वंदाही चाचेर येथील श्री लक्ष्मीनारायण देवस्थान समितीतर्फे त्रिपुरी पौर्णिमा निमित्त तालुका, जिल्हा भंडारा, पोस्ट शहापूर अंतर्गत येत असलेल्या कवडशा गावातील ह भ प निरज निवृत्तीजी मंडारी महाराज यांच्या उद्या बुधवार (ता. २५ नोव्हेंबर)ला दुपारी १२ ते ४ वाजता दरम्यान भव्य कीर्तन, ४ वाजता गोपालकाला, सायं. ७ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.



मागील १०० वर्षांपूर्वीपासून या मंदिरात गावातील भावी ग्रामस्थ, महिला मंडळ, युवक मंडळ त्रिपुरी पौर्णिमेच्या एक महिन्यापूर्वीपासून पहाटेला नियमित दररोज काकड आरती करतात. या काकड आरतीचा समारोप कीर्तन, दहीकाला व महाप्रसादाने होत असते. तरी या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आव्हान श्री लक्ष्मीनारायण देवस्थान समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

आद्यब्रह्मवादिनी फाऊंडेशनतर्फे सामुदायिक तुलसी-दामोदर विवाह उत्साहात संपन्न

२५० हून अधिक भाविकांची उपस्थिती; धार्मिक विधींसह सांस्कृतिक कार्यक्रमांची रंगत



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

आद्यब्रह्मवादिनी फाऊंडेशनतर्फे मुख्य संचालिका आरती महाजन यांच्या संकल्पनेतून रविवार, २२ नोव्हेंबर रोजी दीनदयाल नगर येथील श्री पांडुरंगेश्वर शिव मंदिरात सामुदायिक श्री तुलसी-दामोदर विवाह सोहळा भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्याला २५० हून अधिक भाविक उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात तुलसी पूजनाने झाली. त्यानंतर वाजतगाजत श्रीकृष्णाचा वरधारा काढण्यात आला. ऊसांनी सजविलेल्या मंडपात मंत्रोच्चार, शंखनाद आणि सनईच्या मंगल स्वरांत विवाह विधी पार पडले. अरुणा जोशी व अरुणा वैद्य यांनी सादर केलेल्या मंगलाष्टकांनी सोहळ्याची शोभा वाढविली. चिमुकल्या अस्मि काळे हिच्या शंखवादनानेही उपस्थितांचे लक्ष वेधले. विवाहानंतर पारंपरिक मानपान, सुवासिनींच्या ओट्या भरण्याचा विधी तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

राधिका कुळकर्णी हिने गणेश वंदना, तर पल्लवी नरकाडे यांच्या श्रीसखी चमूने पाऊलभजन सादर केले. महिलांनीही लोकप्रिय गीतांवर फेर धरून आनंदोत्सव साजरा केला. वायेळी सविता जोशी यांनी लहान मुलींना तुळशीची रोपे भेट देऊन पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. मंदिराचे ब्रह्मपुरीकर गुरुजी यांनी विवाहाचे पौरोहित्य केले. कार्यक्रमाचे निवेदन अरुंधती महाजन यांनी केले. संस्थापिका डॉ. वृषाली शिलेदार, सहसंस्थापिका डॉ. योगिताताई कस्तुरे, संचालिका आरती महाजन, अरुंधती महाजन यांच्यासह संस्थेच्या पदाधिकारी व सदस्यांनी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. श्री पांडुरंगेश्वर शिव मंदिर समितीचे अध्यक्ष दिलीप कातरकर यांचे सहकार्य लाभले.

तास कॉलनीत चोरट्यांचा पुन्हा धुमाकूळ!

वीज कर्मचाऱ्याचे घर फोडून २.३९ लाखांचा ऐवज लंपास, चार महिन्यांपूर्वीच्या घटनेची पुनरावृत्ती

दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

शहरातील तास कॉलनी परिसर चोरट्यांच्या रडारवर असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. चार महिन्यांपूर्वी एकाच रात्री सात ठिकाणी घरफोडी झालेल्या याच परिसरात चोरट्यांनी पुन्हा डल्ला मारला. महावितरणच्या कर्मचाऱ्याचे बंद घर फोडून सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रकमेसह २ लाख ३९ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास करण्यात आला. विशेष म्हणजे, वायेळीदेखील चोरट्यांच्या हालचाली सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाल्याची माहिती आहे. त्यामुळे यावेळेला तरी पोलिसांच्या हाती चोरट्यांचा ठोस माग लागतो काय, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

तास कॉलनीतील शांती नगर येथील विनोद गणपत ठाकरे (४४) हे महावितरणमध्ये यंत्रचालक म्हणून कार्यरत आहेत. २३ नोव्हेंबर रोजी सकाळी नऊच्या सुमारास ते घराला कुलूप लावून कर्तव्यावर गेले होते. पत्नी अनिता आणि मुलगाही नातेवाइकांकडे गेल्याने घरात कोणी नव्हते. याच संधीचा फायदा घेत चोरट्यांनी घराच्या लाकडी दरवाजाची स्टीलची कडी कापून आत प्रवेश केला. विशेष म्हणजे, घराच्या बाहेरील लोखंडी गेटचे कुलूप मात्र तसेच ठेवण्यात आले होते.

२४ नोव्हेंबर रोजी सकाळी दहाच्या सुमारास ठाकरे घरी परतले असता घरफोडीचा प्रकार उघडकीस आला. बेडरूममधील लोखंडी कपाटाची दारे उघडी होती. कपडे आणि साहित्य अस्ताव्यस्त पडले होते. लॉकरमधील दागिने ठेवलेले डबे उघडून त्यातील ऐवज चोरट्यांनी लंपास केला होता. ठाकरे कुटुंबीयांचे सोन्याचे दागिने, चांदीच्या तोरड्या आणि रोख २० हजार रुपये असा मोठा ऐवज चोरीला गेला. याशिवाय मोठे बंधू सुनील ठाकरे यांचेही दागिने चोरट्यांनी पळविले.

या घरफोडीनंतर चोरटे थांबले नाहीत. घरामागील आंभोरा सिंचन कॉलनीतील प्रदीप रामदास हटवार यांच्या घरातून १० हजार रुपये, तर शेजारील सुरेश महादेव डोये यांच्या घरातून दोन हजार रुपये चोरीला गेल्याचे तक्रारीत नमूद आहे. एकाच परिसरातील तीन घरांना लक्ष्य करून चोरट्यांनी एकूण २ लाख ३९ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला.

चार महिन्यांपूर्वी याच परिसरात सात घरफोड्या

गत १२ जुलै रोजी याच परिसरात एकाच रात्री सात ठिकाणी घरफोडीच्या घटना घडल्या होत्या. त्या वेळीही चोरटे परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले होते. मात्र, चोरट्यांनी तोंडाला कापड गुंडाळल्याने त्यांची ओळख पटविण्यात अडचणी आल्या होत्या. आता पुन्हा त्याच परिसरात घरफोडी झाली असून, वायेळीही सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी चोरट्यांच्या हालचाली टिपल्याची माहिती आहे. त्यामुळे सीसीटीव्हीच्या मदतीने या वेळेला तरी चोरट्यांपर्यंत पोहोचण्यात पोलिसांना यश येणार का, हा प्रश्न उपस्थित झाला आहे.

बंद घरे चोरट्यांसाठी मोकळे रान ?

एकाच परिसरात वारंवार घरफोडीच्या घटना घडत असल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जुलै महिन्यात एकाच रात्री सात ठिकाणी घरफोड्या होऊनही त्याच परिसरात पुन्हा चोरीची घटना घडणे, ही पोलिसांच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांना आव्हान देणारी बाब ठरली आहे.

विशेष म्हणजे, चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यांत कैद होऊनही त्यांच्या मुसक्या आवळण्यात यश आलेले नाही. आता पुन्हा सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्यांचा माग काढला जाणार की तपासाचे चक्र पुन्हा तिथेच अडकणार, असा सवाल उपस्थित केला जात. वारंवार घडणाऱ्या या घटनांना आळा घालून नागरिकांच्या मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी पोलिसांनी ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

रमना मारोती येथे महापौर किर्तन महोत्सव



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

संतांची आणि सज्जनांची संगत लाभल्यास भगवंताशी संवाद साधण्याचा मार्ग खुला होतो, असे प्रतिपादन ह.भ.प. सोपानदादा कनेरकर महाराज यांनी केले. वैकुंठ चतुर्दशीचे औचित्य साधून नागपूर महानगरपालिकेतर्फे आयोजित महापौर कीर्तन महोत्सव भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडला. 'जय जय रामकृष्ण हरी'च्या गजरात रंगलेल्या या महोत्सवात कानेकर महाराज यांनी आपल्या ओजस्वी कीर्तनातून उपस्थितांना भक्तिरसात चिंब केले. कार्यक्रमाला दक्षिण नागपूरचे आमदार मोहन मते, महापौर नीता ठाकरे,माजी आमदार सुधाकर कोहळे, उपमहापौर लीला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-खबरे, परिवहन समिती सभापती मंगला खेकरे,दिव्या धुरडे , नगरसेवक व माजी स्थायी समिती सभापती पिंटू झलके यांच्यासह विविध समित्यांचे सभापती, झोन सभापती, नगरसेवक, नगरसेविका नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविकात महापौर नीता ठाकरे यांनी तरुण पिढीला सनातन संस्कृती आणि वारकरी परंपरेशी जोडण्याच्या उद्देशाने कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नगरसेवक विजय (पिंटू) झलके यांनी घेतलेल्या परिश्रमांचाही त्यांनी विशेष उल्लेख केला. वायेळी सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांचे त्यांनी आभार मानले. महोत्सवानिमित्त सकाळी रांगोळी स्पर्धा, तर सायंकाळी भव्य दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

कीर्तनातून ह.भ.प. सोमपादादा कानेकर महाराज यांनी संतसंगतीचे महत्त्व विशद केले. संतांच्या आणि भगवंताच्या मार्गावर चालताना स्वार्थ आणि परमार्थ यांचा समतोल कसा साधावा, हे त्यांनी अभंगांच्या माध्यमातून उलगडून सांगितले. संतांची आणि सज्जनांची संगत लाभल्यास भगवंताशी संवाद साधल्याशिवाय राहणार नाही, असे ते म्हणाले.

अस्वलाच्या मृत्यूच्या तपासात दोन वर्षांपूर्वीच्या वाघाच्या शिकारीचा पर्दाफाश : नखे-सुळे विक्रीसाठी घरात ठेवले, आरोपी अटकेत

दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर -धनंजय पांडे

शेतातील तारेच्या कुंपणात सोडलेल्या जिवंत विद्युत प्रवाहामुळे मादी अस्वलासह तिच्या अवघ्या चार ते पाच महिन्यांच्या पिल्लाचा मृत्यू झाल्याच्या घटनेचा तपास करताना वनविभागाने दोन वर्षांपूर्वी झालेल्या वाघाच्या शिकारीचा पदाफाश केला आहे. याच शेतात विद्युत प्रवाह सोडून वाघाची शिकार केल्यानंतर त्याचा मृतदेह जमिनीत पुरण्यात आला होता. विशेष म्हणजे, पुरलेल्या वाघाचे सहा नखे, दोन सुळे आणि एक हाड विक्रीच्या उद्देशाने बाहेर काढून घरी ठेवल्याचे तपासात उघड झाले. या प्रकरणी वनविभागाने आरोपीला अटक केली आहे.

ब्रम्हपुरी वनविभागांतर्गत चिमूर प्रादेशिक वनपरिक्षेत्रातील मौजा बोरगाव रोडी रिठ येथील सर्व्हे क्रमांक १० मधील शेतात २३ नोव्हेंबर रोजी सकाळी ८.३० वाजताच्या सुमारास गस्तीवर असलेल्या वनरक्षकाला एक मादी अस्वल आणि तिचे पिल्लू मृतावस्थेत आढळले.

घटनेची माहिती मिळताच उपवनसंरक्षक डॉ. कुमारस्वामी एस. आर., सहाय्यक वनसंरक्षक (तेंदू), चिमूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी आणि मानद वन्यजीव रक्षक अमोदभाऊ गौरकर यांनी घटनास्थळी धाव घेतली.

पाहणीदरम्यान शेताभोवती लावलेल्या तारेच्या कुंपणात सोडलेल्या जिवंत विद्युत प्रवाहामुळे दोन्ही अस्वलांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. मृत मादी अस्वलाचे वय अंदाजे



पाच ते सहा वर्षे, तर पिल्लाचे वय चार ते पाच महिने असल्याचा अंदाज आहे. या प्रकरणी वनविभागाने फकीरा संभाजी रणदिवे रा. तळोधी नाईक याची चौकशी केली. त्याने यादव दौलत गोठे यांच्याकडून तीन वर्षांसाठी सदर शेत ठेक्याने घेतल्याचे सांगितले. शेताभोवतीच्या तारेच्या कुंपणात जिवंत विद्युत प्रवाह सोडल्यामुळे अस्वल आणि तिच्या पिल्लाचा मृत्यू झाल्याचेही त्याने कबूल केले.

दरम्यान, वनविभागाने अधिक सखोल चौकशी केली असता आरोपीने याच शेतात दोन वर्षांपूर्वी तारेच्या कुंपणात जिवंत विद्युत प्रवाह सोडून वाघाची शिकार केल्याची कबुली दिली. वाघाचा मृतदेह शेतात खड्डा खोदून पुरल्याचेही त्याने सांगितले. जुलै २०२६ मध्ये पुरलेल्या वाघाचे सहा नखे, दोन सुळे आणि एक हाड विक्रीच्या उद्देशाने बाहेर काढून स्वतःच्या घरी नेल्याचे तपासात उघड झाले.

वनविभागाने आरोपीचा घराची झडती घेऊन वाघाचे सहा नखे, दोन सुळे आणि एक हाड जप्त केले. त्यानंतर आरोपीला अटक करून चिमूर येथील प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने आरोपीला २७ नोव्हेंबर २०२६ पर्यंत वनकोठडी सुनावली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास उपवनसंरक्षक डॉ. कुमारस्वामी एस. आर. यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक वनसंरक्षक डॉ. एम. बी. गायकवाड, चिमूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी के. बी. देऊरकर आणि तळोधीचे वनपरिक्षेत्र अधिकारी तेजस बा. सूर्यवंशी करीत आहेत.

थोडक्यात

जय जय रामकृष्ण हरीच्या गजराने दुमदुमली वाडीनगरी, काकड आरतीनिमित्त भव्य दिंडी



दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

दत्तवाडी येथील शुभारंभ सोसायटीमधील श्री हनुमान मंदिरात संपूर्ण कार्तिक महिनाभर दररोज पहाटे काकड आरतीचे आयोजन करण्यात आले होते. या धार्मिक उपक्रमाच्या समारोपानिमित्त मंगळवार, २४ नोव्हेंबर रोजी पहाटे परिसरातून भव्य दिंडी काढण्यात आली. टाळ, मृदंग आणि वीणेच्या निनादात 'जय जय रामकृष्ण हरी'चा अखंड जयघोष करीत निघालेल्या या दिंडीमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. दिंडीमध्ये विणेकरी प्रभाकर महाराज केदार, मृदंगवादक अरुण कराळे, शरद टोळे,गायक संजय टोळे व राहुल थोर, तसेच टाळकरी गोपाळ फुले, गणपत रागीट, केशव बांदरे, सुभाष अंजीकर, चंद्रशेखर (बबलू) ढाकरिया, प्रकाश पडोळे,रुपराव मोवाळे आदींनी भक्तिगीतांची साथसंगत केली.

यावेळी अनिल गुप्ता, भिखुराम शर्मा, किसन हजारे, मनोहर पिल्ले, महादेव मिश्रा, राजू सावंत, राजेंद्र मस्के, जैलाल मेश्राम, पलाश आगरे, चिराग आगरे आदींसह महिला मंडळाच्या सुरेखा बांदरे, निलीमा टोळे, प्रतिभा उमाळे, बबीता अंजीकर, दीपा मस्के, रोहिणी मस्के, शिला पडोळे, माधुरी भोंगळे, अर्चना उज्जैनकर, इंदू शर्मा, सीमा धुमाळ, बेबीताई माडेकर, रीता मेश्राम, प्रतीक बांदरे आदींनी सहभाग घेतला. दिंडीत शेकडो भाविक सहभागी झाले होते. बुधवार, २५ नोव्हेंबर रोजी दु दुपारी गोपालकाला व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, त्यानंतर या धार्मिक सोहळ्याची सांगता होणार आहे.

बुटीबोरी आयटीआयमध्ये दीक्षांत समारंभ

दै. सिंहवाणी वृत्त, बुटीबोरी

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, बुटीबोरी येथे दीक्षांत समारंभ २१ नोव्हेंबर रोजी उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रशांत कडू, डायरेक्टर, गायकवाड पाटील इंजिनिअरिंग कॉलेज,मोहगाव तसेच कान्होलीचे उपसरपंच मिलिंद कोवे उपस्थित होते. यावेळी दोन्ही मान्यवरांनी प्रशिक्षणार्थ्यांना कौशल्य विकास, रोजगाराच्या संधी आणि उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे गटनिदेशक शैलेंद्र कुंटे होते. यावेळी सुधीर कांबळे यांच्यासह संस्थेतील सर्व शिक्षकवृंद, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात विविध ट्रेडमधील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झालेल्या या समारंभामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले.



महिलांच्या स्वावलंबनासाठी युनिटी क्रेडिट सोसायटीचा पुढाकार!

स्वत:चा व्यवसाय उभारणाऱ्या महिलांचा प्रथम वर्धापन दिनानिमित्त गौरव



दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करून त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने युनिटी क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या वाडी शाखेच्या वतीने प्रथम वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. २० नोव्हेंबर रोजी आयोजित या कार्यक्रमात सोसायटीकडून कर्जस्वरूपात आर्थिक मदत घेऊन स्वतःचे व्यवसाय सुरू करणाऱ्या महिलांचा सत्कार करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजकल्याण प्रकल्पाधिकारी हृदय गोडबोले होते. प्रमुख पाहुणे म्हणून विशेष कार्यकारी अधिकारी अरुण कराळे, गजानन तलमले, धनराज केळझरे, सोसायटीचे संचालक शशिष गजभिये व उपसंचालक भाग्यशाली गजभिये (शेंडे) उपस्थित होते.

सोसायटीच्या माध्यमातून आर्थिक सहकार्य मिळाल्याने प्रमिला पाटणकर, आशा वानखेडे, शालिनी वानखेडे, शांताबाई फटिंग यांच्यासह अनेक महिलांनी छोटे व्यवसाय सुरू केले आहेत. या व्यवसायाच्या माध्यमातून त्या स्वतः आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासोबतच कुटुंबाच्या आर्थिक प्रगतीतही मोलाचे योगदान देत आहेत. महिलांच्या या यशस्वी वाटचालीचे कौतुक करून त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी सोसायटीच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महिलांनी केवळ बचतीपुरते मर्यादित न राहता स्वतःचा व्यवसाय उभारून आर्थिक स्वावलंबन साधावे, असे आवाहन करण्यात आले. व्यवसाय सुरू करण्यासाठी आर्थिक मदतीची गरज असलेल्या महिलांनी सोसायटीशी संपर्क साधावा. त्यांना कर्जाच्या माध्यमातून आवश्यक ते सहकार्य करण्यासाठी सोसायटी कटिबद्ध असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे संचालन राहुल फलके यांनी केले, तर आभार आशिष गजभिये यांनी मानले. यावेळी विलास माडेकर, नागेश बोरकर, दिलीप ताळेकर, नरेशकुमार चव्हाण, वैभव तिरपुडे, नितेश मेश्राम यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

बालकांच्या कलाविष्कारांना मिळाले हक्काचे व्यासपीठ

बाल-कुमार साहित्य संमेलनाचा थाटात समारोप



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नृत्य, कवितावाचन, कथाकथन, पथनाट्य, भाषण, चर्चा आणि निवेदन अशा विविध कलाप्रकारांतून बालकांनी आपल्या कलागुणांचे प्रभावी सादरीकरण केले. बाल-कुमार साहित्य संमेलनाने बालकलाकारांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले. संमेलनाचा दुसरा दिवस बालकांच्या विविध कलाविष्कारांसोबतच त्यांच्या जडणघडणीशी संबंधित विषयांवर शिक्षक, पालक आणि मान्यवरांनी केलेल्या चर्चांनी गाजला.

स्त्री शिक्षण प्रसारक मंडळ, बाल कला अकादमी आणि विदर्भ सांस्कृतिक परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने महिला महाविद्यालयाच्या प्रांगणात दोन दिवसीय बाल-कुमार साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. सोमवारी आयोजित समारोपीय कार्यक्रमाला प्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ. उदय बोधनकर, किशोर मासिकाचे कार्यकारी संपादक तथा संमेलनाध्यक्ष किरण केद्रे, स्त्री शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व संमेलनाचे संयोजक रवींद्र फडणवीस, प्राचार्या डॉ. रीता सोनटक्के, साहित्यिक प्रसेनजित गायकवाड, देवराव मांडवकर आणि विशाल देवते उपस्थित होते. किरण केद्रे यांनी समारोपीय भाषणातून मुलांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. एखादी चांगली गोष्ट ऐकली, चांगल्या माणसांच्या सहवासात राहिले की मुलांच्या व्यक्तिमत्त्वाला योग्य आकार मिळतो. हे काम या संमेलनाने केले आहे. मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण होऊन पुस्तक वाचणारी पिढी घडावी, हेच या संमेलनाचे खरे फलित ठरेल, असे ते म्हणाले.

डॉ. उदय बोधनकर यांनी मुलांना मोबाईलच्या अतिवापर टाळण्याचा तसेच जंक फूड आणि शीतपेयांचे सेवन न करण्याचा सल्ला दिला. मुलांच्या जडणघडणीत पालकांची भूमिका महत्त्वाची असून, त्यांनी मुलांसमोर स्वतःच्या आचरणातून आदर्श निर्माण करावा, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वंदना देशपांडे यांनी केले. आभार प्रा. उर्वशी यांनी केले.

बालसुरक्षेसाठी समाजाने सजग राहण्याची गरज, चर्चासत्रात झाले मंथन

बालकांची सुरक्षा आणि संरक्षण ही केवळ शाळा, पालक किंवा शासकीय यंत्रणेची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. बालकांवरील शारीरिक व भावनिक हिंसाचार, कौटुंबिक कलह, ऑनलाइन अत्याचार तसेच शाळांमधील विविध प्रकारच्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी समाजाने अधिक सजग राहण्याची गरज आहे, असा सूर बालकांच्या सुरक्षेचा प्रश्न आणि पालक, समाज, शासकीय यंत्रणा यांच्या भूमिका या विषयावरील चर्चासत्रात उमटला.

स्त्री शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूर आणि बाल कला अकादमी, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय बाल-कुमार साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी नंदनवन येथील महिला महाविद्यालयाच्या प्रांगणात हे चर्चासत्र झाले. चर्चासत्रात जिल्हा बालकल्याण समितीच्या अध्यक्षा छायाताई राउत, जि.प. नागपूरचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) अनिल दहीफळे, महिला व बाल विकास अधिकारी सुनील मेसरे, बाल संरक्षण अधिकारी मुश्ताक पठाण तसेच जि.प. शिक्षण विभागाचे पर्यायी शिक्षण व बालरक्षण समन्वयक प्रसेनजित गायकवाड सहभागी झाले.

घरकुल कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना शासनाकडून केराची टोपली?

हिवाळी अधिवेशनात प्रश्न उपस्थित करण्यासाठी आमदार संजय मेश्राम यांना साकडे; शासन सेवेत विलीनीकरणासह समान वेतनाची मागणी



दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

राज्यातील बेघर आणि गरजू कुटुंबांना हक्काचे घर मिळवून देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या घरकुल योजनांचा गाडा ओढणारे कंत्राटी कर्मचारी मात्र स्वतःच असुरक्षिततेच्या छायेत आहेत. वर्षानुवर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावूनही ना नोकरीची शाश्वती, ना वेतनात समानता, ना सेवाविषयक सुविधांचे संरक्षण! शासनाच्या महत्त्वाकांक्षी घरकुल योजनेचा कणा असलेल्या या कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य घरकुल कंत्राटी कर्मचारी संघटनेने आता आमदारांचे दरवाजे ठोठावले आहेत.

संघटनेच्या वतीने विधानसभेचे आमदार संजय मेश्राम यांना निवेदन देण्यात आले. येत्या ७ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात घरकुल कर्मचाऱ्यांचे प्रश्न उपस्थित करून त्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

ग्रामविकास विभागांतर्गत प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) आणि राज्य पुरस्कृत विविध घरकुल योजनांच्या अंमलबजावणीत हे कर्मचारी महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. लाभार्थ्यांची नोंदणी, योजनांचा पाठपुरावा आणि घरकुलांची कामे पूर्णत्वास नेण्यासाठी त्यांची धावपळ सुरू असते. मात्र, शासनाच्या याच योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या भविष्याचीच हमी शासनाकडे नाही, अशी खंत संघटनेने व्यक्त केली आहे.

संघटनेने कंत्राटी कर्मचाऱ्यांचे शासन सेवेत विलीनीकरण करण्याची प्रमुख मागणी केली आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांप्रमाणे घरकुल कर्मचाऱ्यांनाही सेवेत सामावून घेऊन शासकीय सवलती द्याव्यात, बाह्य यंत्रणेमार्फत होणारी नियुक्ती बंद करून जिल्हा परिषद आस्थापनेवर थेट कंत्राटी नियुक्ती करावी, अशी मागणी आहे. याशिवाय तालुका व जिल्हास्तरीय ऑपरेटरना राज्यस्तरीय ऑपरेटरप्रमाणे समान मानधन द्यावे, महिला कर्मचाऱ्यांना प्रसूती रजा आणि वैद्यकीय सुविधा लागू कराव्यात, अशीही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. तालुका स्तरावरील नवीन ऑपरेटर भरती प्रक्रिया रद्द करून संबंधित तालुका व जिल्ह्यांकडून मागणीपत्र प्राप्त झालेल्या ठिकाणीच नवीन पदे प्राधान्याने उपलब्ध करून द्यावीत, असे संघटनेने म्हटले आहे.

विशेष म्हणजे, अनेक कर्मचाऱ्यांनी या सेवेत आयुष्यातील महत्त्वाची वर्षे खर्ची घातली आहेत. परिणामी शासकीय आणि खासगी नोकरीसाठीची वयोमर्यादाही ओलांडली आहे. अशा कर्मचाऱ्यांना सेवेतून बाहेर पडण्याची वेळ आल्यास त्यांच्या कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होणार आहे. त्यामुळे या कर्मचाऱ्यांना शासन सेवेत प्राधान्याने सामावून घेऊन त्यांच्या भविष्याला संरक्षण द्यावे, अशी आग्रही भूमिका संघटनेने मांडली आहे.

आता हिवाळी अधिवेशनात आमदार संजय मेश्राम हे या कर्मचाऱ्यांचा आवाज विधानसभेत बुलंद करतात का आणि शासन त्यांच्या मागण्यांबाबत ठोस निर्णय घेते का, याकडे राज्यातील घरकुल कंत्राटी कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

गुरुनानक जयंती निमित्ताने दिवसभर लंगरचे आयोजन, हजारो भाविकांनी घेतला लाभ



दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

शीख धर्माचे संस्थापक गुरुनानक देवजी यांच्या प्रकाश पर्व जयंती निमित्ताने वाडी सेवा समिती तर्फे जयंती पर्व उत्साहात साजरी करण्यात आली. सेवा समितीचे पदाधिकारी मनिंदर सिंह परमार,लक्की मेहरा, रिक्की मेहरा,अखिल पोहनकर,काव्य गुरव, राज सिंह, स्वप्निल चोखाद्रे, गुरप्रीत सिंह,जस्सी सिंह यांनी दिवसभर चालणाऱ्या लंगरचे आयोजन केले होते. यावेळी परिसरातील हजारो भाविकांनी भोजनाचा लाभ घेतला.

या कार्यक्रमात सिद्धांत सितावर,मयंक भोपे,अरमान झज्ज,राजेश ईचे,कबीर मौर्य,जैसी संधु,संजय लकडे,प्रणय अगरकर,रजनीश झा,मनजीत बजवा,पप्पू पटले,गुरप्रीत सिंह सैनी,परमिंदर परमार,मनिंदर परमार,पवन राठी,अखिल निंबालकर, राजा शाह, चंदन सिंह, नीरज शर्मा, लकी बैंकनोट, सोम वर्मा,राज सिंह,बिट्टू दिलेर सिंह,जगतार सिंह,दक्ष वानखेड़े,काव्य गुरव,लकी डुले, आकाश पैरोल, मधु मनके, चारू नरबरीया,निशांत रावत,अश्विन बैस आदींनी सहकार्य केले होते.

रामटेकच्या शोभायात्रेत चाचेरच्या झाँकीचा डंका; 'बाप मायेच्या सागर'ने जिंकली प्रेक्षकांची मने!

छत्रपती युवा प्रतिष्ठान, चाचेरच्या सामाजिक संदेश देणाऱ्या झाँकीला द्वितीय क्रमांक; ७१ हजार रुपयांचे पारितोषिक



दै. सिंहवाणी वृत्त,
किशोर साहू : मौदा

रामटेक येथे भारतीय जनसेवा मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेत छत्रपती युवा प्रतिष्ठान, चाचेर यांच्या वतीने सादर करण्यात आलेल्या 'लेकीच्या सुरक्षेसाठी बापाची धडपड अर्थात बाप मायेच्या सागर' या सामाजिक संदेश देणाऱ्या झाँकीने उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. या झाँकीला शोभायात्रेत द्वितीय क्रमांक प्राप्त झाला असून, भारतीय जनसेवा मंडळाच्या वतीने ७१ हजार रुपयांचे रोख पारितोषिक प्रदान करण्यात आले. या यशामुळे रामटेकच्या सांस्कृतिक व्यासपीठावर चाचेर गावाच्या नावाचा गौरव झाला आहे.

आजच्या समाजात मुलींची सुरक्षा, महिलांचा सन्मान आणि त्यांच्यावरील वाढते अत्याचार हे अत्यंत गंभीर विषय बनले आहेत. या पार्श्वभूमीवर केवळ मनोरंजन न करता कलेच्या माध्यमातून समाजातील ज्वलंत प्रश्न मांडण्याचा उद्देशाने छत्रपती युवा प्रतिष्ठानच्या टीमने 'बाप मायेच्या सागर' ही झाँकी सादर केली.

एका मूक आणि गरीब बापाची मुलगी जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेत असते. मात्र शाळेच्या परिसरात व्यसनाधीन आणि समाजविघातक प्रवृत्तीच्या व्यक्तींकडून मुलींना त्रास दिला जातो. अशा परिस्थितीत अन्यायाविरुद्ध आवाज उठवणाऱ्या मुलीला गंभीर संकटाचा सामना करावा लागतो. आपल्या लेकीच्या सुरक्षेसाठी आणि न्यायासाठी एका असहाय्य बापाला करावी लागणारी धडपड या सादरीकरणातून प्रभावीपणे मांडण्यात आली.

या झाँकीमागील मुख्य भावना कोणत्याही धर्माचा किंवा समाजाचा विषय मांडण्याची नसून, मुलींच्या सुरक्षिततेचा, महिलांच्या सन्मानाचा आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याचा सामाजिक संदेश जनमानसापर्यंत पोहोचवणे ही होती. मुलींना सुरक्षित वातावरण मिळावे, पालकांनी आपल्या मुलींच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे आणि समाजाने अशा घटनांविरोधात एकजुटीने आवाज उठवावा, हा संदेश या सादरीकरणातून देण्यात आला.

झाँकीचे सादरीकरण पाहताना अनेक प्रेक्षक भावूक झाले. विषयाचे गांभीर्य, कलाकारांचा अभिनय आणि सादरीकरणातील भावनिक प्रसंग यामुळे या झाँकीची विशेष चर्चा झाली. क्रमांकापेक्षा समाजापर्यंत पोहोचलेला संदेश अधिक महत्त्वाचा असल्याची भावना प्रतिष्ठानच्या सदस्यांनी व्यक्त केली.

या झाँकीमध्ये प्राजक्ता अढाऊ, वंशिका साखरवाडे, तनुश्री कुल्लरकार, स्वरा सखारवाडे, आकाश साखरवाडे, आर्यन पारधी, प्रणय कुल्लरकार, पियूष कुल्लरकार, अमित बावनकुळे, रोहित मलेवार, सचिन कुल्लरकार आणि सुरज कुल्लरकार या कलाकारांनी भूमिका साकारत आपल्या अभिनयातून सामाजिक विषय प्रभावीपणे मांडला.

या संपूर्ण सादरीकरणासाठी प्रोप्रायटर सचिन दिलीप बावनकुळे यांच्यासह छत्रपती युवा प्रतिष्ठान, चाचेरच्या संपूर्ण टीमने मेहनत घेतली. तसेच या उपक्रमासाठी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सहकार्य करणारे चाचेर ग्रामवासी, मित्रपरिवार आणि सर्व सहकाऱ्यांचेही महत्त्वपूर्ण योगदान लाभले.

या यशाबद्दल छत्रपती युवा प्रतिष्ठानच्या वतीने भारतीय जनसेवा मंडळ, रामटेकचे आभार व्यक्त करण्यात आले. तसेच सादरीकरणाला प्रसिद्धीच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल रामटेक राम नगरी पेजचेही विशेष आभार मानण्यात आले.

हा पुरस्कार केवळ छत्रपती युवा प्रतिष्ठानचा नसून संपूर्ण चाचेर गावाचा सन्मान आहे. आमचा उद्देश केवळ पारितोषिक मिळवणे नसून कलेच्या माध्यमातून समाजातील महत्त्वाचे प्रश्न मांडणे आणि जनजागृती करणे हा आहे. यापुढेही अशाच सामाजिक विषयांवर अधिक प्रभावी सादरीकरण करण्याचा आमचा प्रयत्न राहील, अशी भावना प्रतिष्ठानच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

रामटेकच्या शोभायात्रेत चाचेरच्या कलाकारांनी सादर केलेल्या या झाँकीमुळे गावाच्या सांस्कृतिक आणि सामाजिक कार्याची ओळख निर्माण झाली असून, या यशाबद्दल छत्रपती युवा प्रतिष्ठान, सर्व कलाकार आणि सहकार्य करणाऱ्या समस्त चाचेर ग्रामवासीयांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

थोडक्यात

सोशल मीडियावरील कथित राजकीय सेन्सॉरशिपविरोधात युवक काँग्रेस आक्रमक

मेटाला सात दिवसांचा अल्टिमेटम;

अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या संरक्षणाची मागणी



दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

सत्ताधाऱ्यांवर टीका करणाऱ्या आवाजांना सोशल मीडियाच्या माध्यमातून दाबले जात असल्याचा आरोप करत महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसने मेटा कंपनीविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. हैदराबाद, गुरुग्राम आणि मुंबई येथील मेटाच्या कार्यालयांबाहेर आंदोलन केल्यानंतर भारतीय युवक काँग्रेसने कंपनीला स्पष्टीकरण देण्यासाठी सात दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे. यासंदर्भात महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसने पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली. सोशल मीडिया खात्यांवर सरकारी आदेशानुसार निर्बंध लादले जात असून, राजकीय टीका करणाऱ्या पोस्ट रोखल्या जात असल्याचा आरोप युवक काँग्रेसने केला आहे. गेल्या सहा महिन्यांत सरकारी आदेशानुसार किती भारतीय खात्यांवर निर्बंध घालण्यात आले, राहुल गांधी यांचा उल्लेख करणाऱ्या तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपवर टीका करणाऱ्या पोस्टवरच ब्लॉकिंगची कारवाई का केली जाते, असे सवाल उपस्थित करण्यात आले.

विरोधी पक्षांचे नेते, पत्रकार, स्वतंत्र कंटेंट निर्माते आणि सामान्य नागरिकांवरील कथित अन्यायकारक निर्बंध तातडीने मागे घेण्याची मागणीही करण्यात आली. मेटाने कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता संविधानातील अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या मूल्यांचा आदर करावा, असे आवाहन युवक काँग्रेसने केले. 'सरकारवर टीका करणे हा गुन्हा नाही, मतभेद म्हणजे देशद्रोह नाही आणि सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारणे हा प्रत्येक नागरिकाचा लोकशाही अधिकार आहे,' अशी भूमिका युवक काँग्रेसने मांडली. या मागण्यांवर सात दिवसांत समाधानकारक प्रतिसाद न मिळाल्यास आंदोलनाची पुढील दिशा ठरविण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

राज्यपालांचे नागपूर येथे आगमन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांचे दोन दिवसीय दौऱ्यासाठी आज सायंकाळी नागपूर येथे आगमन झाले. आगमनप्रसंगी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे प्रशासनाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सह पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, अप्पर विभागीय आयुक्त वैष्णवी बी, पोलिस उपायुक्त अनिल म्हस्के, राजशिष्टाचारच्या उपजिल्हाधिकारी इंदिरा चौधरी यावेळी उपस्थित होत्या.

राज्यपाल जिष्णु देव वर्मा उद्या दिनांक २५ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या वतीने आयोजित स्वर्यसिद्धा - विजया या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती राहतील. दुपारी १२.३५ वाजता हेलिकॉप्टरने यवतमाळकडे रवाना होतील. दुपारी २.३० वाजता यवतमाळ येथे दैनिक लोकमतचे संस्थापक संपादक जवाहरलाल दर्डा यांच्या पुतळा अनावरण कार्यक्रमाला उपस्थित राहतील. त्यानंतर सायंकाळी ८.५० वाजता नागपूर येथून मुंबईकडे प्रस्थान करतील.

पेंचच्या जंगलात रंगली सॅटर्डे क्लब सदस्यांची मांदियाळी



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्टच्या नागपूर ऑरेंज सिटी चॅप्टरतर्फे रविवारी पेंच व्याघ्र प्रकल्पातील वसुंधरा स्ट्रीट जंगल लॉज येथे विशेष सोशल प्रोग्रॅमचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यावसायिक धकाधकीतून विरंगुळा मिळावा, सदस्यांमधील मैत्रीचे बंध दृढ व्हावेत आणि परस्पर व्यावसायिक संवाद वाढावा, या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमात नियमित बैठक, व्यवसायिक संबंध धृढ होण्याकरिता विविध उपक्रम आणि पेंच जंगल सफारीचा आनंद सदस्यांनी घेतला. या कार्यक्रमाला रिजन चॅप्टर चेअरपर्सन शरद अरसडे, सचिव आशिष कृ. तगलपल्लेवार आणि कोषाध्यक्ष हेमलता जवंजाळ यांच्यासह अँड. संदीप गौतम, राकेश समर्थ, सूरज माटे, भगवान निनावे, मोहन काळबांडे, आकाश कांबळे, मनीष दिवे, सुजीत सोनकुसरे, डॉ. सुरेश भांडारकर, पराग देशमुख, अर्पिता घुल्हाने, स्वप्नील झूनके, अमित खारकर, आशिष कापरे, सौरभ राजूरकर, सुशांत नायसे, निनेश बेलगे, ख्याती मेहर, ईशान मोटघरे, राहुल जारोडे, अश्मिता भट्ट आणि विकास अतकर उपस्थित होते.

सॅटर्डे क्लबच्या 'एकमेका साह्य करू, अवघे होऊ श्रीमंत!' या ब्रीदवाक्यानुसार उद्योजकांमध्ये व्यावसायिक सहकार्य, विश्वास आणि नेटवर्किंगची भावना वृद्धिंगत करणारा हा उपक्रम उत्साहात पार पडला.

कामठी मतदारसंघात पालकमंत्री बावनकुळेंचा गावभेटींचा धडाका

अधिकाऱ्यांकडून विकासकामांचा आढावा, ग्रामस्थांशी साधला थेट संवाद, जलसंधारणापासून वीजपुरवठ्यापर्यंत विविध प्रश्नांवर चर्चा, महिला व बालकल्याण, संजय गांधी निराधार योजना आणि शेतकऱ्यांच्या कर्जमाफीला प्राधान्य

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

कामठी विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागातील विकासकामांना गती देण्यासाठी महसूलमंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी गावभेटींचा धडाका सुरू केला आहे. आज वडोदा-भुगाव आणि गुमथळा जिल्हा परिषद क्षेत्रातील विविध गावांना भेटी देत त्यांनी ग्रामस्थांशी थेट संवाद साधला. नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासोबतच संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांकडून विकासकामांचा आढावाही घेतला.



या गावभेट दौऱ्यात जलसंधारण, आरोग्य, शिक्षण, घरकुलांचे मालकी हक्क, अन्नधान्य पुरवठा आणि वीजपुरवठा या मूलभूत प्रश्नांवर विशेष चर्चा करण्यात आली. तसेच महिला व बालकल्याण विभागाच्या योजना, पोलीस विभागाशी संबंधित समस्या, संजय गांधी निराधार योजनेचे लाभ, शेतकऱ्यांची कर्जमाफी आणि इतर स्थानिक प्रश्नांनाही प्राधान्य देण्यात आले. गावागावांतील नागरिकांनी आपल्या समस्या आणि मागण्यांबाबत निवेदने सादर केली. श्री. बावनकुळे यांनी ग्रामस्थांचे म्हणणे ऐकून घेत संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. प्रलंबित कामे, योजनांच्या अंमलबजावणीतील अडचणी आणि नागरिकांना उपलब्ध होणाऱ्या सुविधांचा आढावा घेत त्यांनी समस्यांचे तातडीने निराकरण करण्याच्या सूचना दिल्या.

या दौऱ्यादरम्यान त्यांनी पात्र लाभार्थ्यांना घरकुलांचे पट्टे वितरित केले. घरकुलांसाठी जमिनीचे मालकी हक्क मिळवून देण्यासह विविध शासकीय योजनांचा लाभ पात्र नागरिकांपर्यंत पोहोचविण्यावर त्यांनी भर दिला.

गावपातळीवरच प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न

गावभेटींच्या माध्यमातून नागरिकांना आपल्या समस्या थेट मांडता याव्यात आणि प्रशासनाने त्यावर तातडीने कार्यवाही करावी, हा या दौऱ्यामागील प्रमुख उद्देश आहे. केवळ विकासकामांचा आढावा न घेता सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि गरजू कुटुंबांच्या प्रश्नांना प्राधान्य देण्याची भूमिका श्री. बावनकुळे यांनी घेतली आहे. त्यामुळे कामठी विधानसभा मतदारसंघातील या गावभेट दौऱ्याच्या माध्यमातून स्थानिक प्रश्नांच्या निराकरणासाठी नागरिक आणि प्रशासन यांच्यात थेट समन्वय साधण्याचा प्रयत्न केला जात आहे.

यावेळी माजी आ. टेकचंद सावरकर, भाजप नागपूर जिल्हाध्यक्ष आनंदराव राऊत, भाजप नागपूर जिल्हा महामंत्री अनिल निधान, रमेश चिकटे, मंडळ अध्यक्ष सचिन घोडमारे, उमेश रडके, महिला मोर्चा अध्यक्षा नेहाताई राऊत, लीलाधर काळे, नामदेव ठाकरे, संजय गांधी निराधार योजना, कामठी क्षेत्राच्या अध्यक्षा प्रांजलताई वाघ, वारंभा ग्रामपंचायतच्या सरपंच ज्योतीताई भोयर, तरोडी ग्रामपंचायतच्या सरपंच आरतीताई चिकटे, गादा ग्रामपंचायतचे सरपंच सचिन डागे, पोलीस पाटील मेघराज मस्के, अंकित रेवतकर, अरविंद शहाणे, दुर्योधन गोतमारे, कैलास घोडमारे यांच्यासह नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

रामटेकमध्ये २६ नोव्हेंबरला भव्य संविधान रॅलीचे आयोजन

दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक : भारतीय संविधान दिनाचे औचित्य साधून रामटेक शहरात गुरुवार, दिनांक २६ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वा. भव्य संविधान रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. विविध जाती, धर्म, परंपरा आणि संस्कृतींनी नटलेल्या भारत देशाला एकसंघ ठेवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य भारतीय संविधानाने केले आहे. स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता ही संविधानाची मूलभूत मूल्ये जनमानसात रुजविण्याच्या उद्देशाने या रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. विदर्भभूमी दक्षता समिती, शाखा रामटेक, समता सैनिक दल, शाखा रामटेक, महिला मैत्री संघ, रामटेक तसेच फ्रेंड्स फॉरएव्हर महिला ग्रुप, रामटेक यांच्या संयुक्त विद्यमाने या संविधान रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

भारतीय संविधानाचा स्वीकार २६ नोव्हेंबर १९४९ रोजी करण्यात आला, तर २६ जानेवारी १९५० रोजी संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली. भारतीय संविधानाने देशातील प्रत्येक नागरिकाला स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुतेचा अधिकार प्रदान केला आहे. भारतीय संविधानाचे निर्माते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या या संविधानाचे महत्त्व समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावे, संविधानिक मूल्यांबाबत जनजागृती व्हावी, हा या रॅलीमागील प्रमुख उद्देश आहे. गुरुवारी सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुतळा बसस्थानक येथून रॅलीला सुरुवात होणार आहे. ही रॅली डॉ. आंबेडकर चौक, तहसील कार्यालय, गांधी चौक मार्गे शनीवारी वॉर्ड, रामटेक येथे पोहोचून संपन्न होणार आहे. या रॅलीत नागरिकांनी, सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच युवक-युवतींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. रॅलीत सहभागी होणाऱ्या सर्वांनी पांढरे कपडे परिधान करून एकजूट आणि एकात्मतेचा संदेश द्यावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

मानवी मूल्यांची गुंतागुंत उलगडणारे 'स्वस्तिकाची ट्रॅजेडी'

६५ वी महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या वतीने आयोजित ६५ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा २०२६-२७ च्या दुसऱ्या दिवशी तांडव क्रिएशन, नागपूर प्रस्तुत 'स्वस्तिकाची ट्रॅजेडी' या नाटकाचे सादरीकरण करण्यात आले. साईशरण घोलप, अजय पाटील, सुमेध गायकवाड आणि अदिती जमेदर लिखित या नाटकाचे दिग्दर्शन अभिषेक बेल्लारवार यांनी केले. नागपूर केंद्रावरील ही स्पर्धा डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात सुरू आहे.

प्रयोगाच्या काही क्षण आधी घडणाऱ्या घटनांच्या माध्यमातून 'स्वस्तिकाची ट्रॅजेडी' हे नाटक कला, विचारस्वातंत्र्य, सत्य आणि आर्थिक गरजा यांच्यातील गुंतागुंतीचे नाते उलगडते. आर्थिक अडचणींमुळे संस्थेतील कलाकार नरेन याने लिहिलेल्या हिटलरचे समर्थन करणाऱ्या नाटकात काम करण्यास तयार होतात. मात्र, नाटकातील भूमिका, मांडणी आणि तालमीदरम्यान निर्माण झालेले गैरसमज यांमुळे कलाकारांमध्ये नाराजी पसरते. वातून नरेन आणि अन्य कलाकारांमध्ये वैचारिक संघर्ष उभा राहतो. आयुष्याचा अर्थ, कलेची ताकद, देशप्रेम, अल्पसंख्याकांवरील अत्याचार, युद्ध आणि हुकूमशाही अशा गंभीर विषयांना स्पर्श करत हे नाटक मानवी मूल्यांमधील संघर्ष आणि नैतिकतेची गुंतागुंत प्रभावीपणे मांडते.

नाटकात अद्वैत घांगरेकर, अदिती सोहनी, रितेश लंगोटे, वैभव लक्षणे, गुंजन पळसापुरे, छकुली जाधव, सावनी बडगे, समीर शिंदे आणि ऐश्वर्या शिंदे यांच्या भूमिका आहेत. संगीत वैभव वाघमारे यांचे असून नेपथ्य शुभम मस्के आणि आशीष ठाकरे यांनी सांभाळले. रंगभूषा व वेशभूषा शरयू मते-देठे यांची होती. नाटकाचे निर्मितीप्रमुख किशोर बत्तासे आहेत.

उमरेडमध्ये तंबाखूविरोधी जनजागृती कार्यशाळा

आयटीआयमधील विद्यार्थ्यांना तंबाखू सेवनाच्या दुष्परिणामांची माहिती



दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड

तरुण पिढीला तंबाखूच्या व्यसनापासून दूर ठेवण्यासह तंबाखू सेवनाच्या दुष्परिणामांबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने तंबाखूमुक्त युवा अभियान ४.० अंतर्गत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आयटीआय, उमरेड येथे तंबाखूविरोधी जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. शिवसाम्राज्य बहुउद्देशीय संस्था, उमरेड यांच्या वतीने आयोजित या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

कार्यशाळेत नरोत्तम सेखसरिया फाउंडेशन, मुंबईचे प्रकल्प समन्वयक सतीन अंकालू यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तंबाखू सेवनामुळे होणारे विविध आजार, शारीरिक व मानसिक आरोग्यावर होणारे दुष्परिणाम तसेच तरुण वयात व्यसनांपासून दूर राहण्याचे महत्त्व याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. तंबाखूमुक्त जीवनशैली स्वीकारून निरोगी जीवन जगण्याचे आवाहनही त्यांनी विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयटीआयचे प्राचार्य सी. एस. राऊत होते. यावेळी सलाम मुंबई फाउंडेशनचे प्रतिनिधी मोनिष अठुरकर व धर्मपाल चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी स्वतः तंबाखू व इतर व्यसनांपासून दूर राहण्यासोबतच आपल्या कुटुंबात आणि समाजात तंबाखूविरोधी जनजागृती करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन श्रुती लांडे यांनी केले, तर महेश वंजारी यांनी आभार मानले. यावेळी दिलीप मस्की व अजय कनोजे उपस्थित होते.

आम नदीचे मूळ पात्र पूर्ववत करा, हिवाळी अधिवेशनात प्रश्न मांडण्याची मागणी

कळमना ग्रामपंचायत व शेतकऱ्यांचे आमदार संजय मेश्राम यांना निवेदन

दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड
मनिष शिंगणे

उमरेड वेकोलिच्या खाणकामामुळे आम नदीचे नैसर्गिक पात्र वळविण्यात आल्याने उमरेड तालुक्यातील कळमना, शिरपूर, नरसाळा, कान्हवा परिसरासह नदीकाठच्या गावांमध्ये पावसाळ्यात पूरस्थिती निर्माण होत असल्याचा आरोप करीत आम नदीचे मूळ नैसर्गिक पात्र पूर्ववत करण्याची मागणी कळमना ग्रामपंचायतीचे सरपंच व परिसरातील शेतकऱ्यांनी आमदार संजय मेश्राम यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. येत्या हिवाळी अधिवेशनात हा प्रश्न शासनाचा निदर्शनास आणून ठोस उपाययोजना करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

वेकोलिकडून आम नदीचे नैसर्गिक पात्र वळविण्यामुळे निर्माण झालेल्या पूरस्थितीवर कायमस्वरूपी उपाययोजना कराव्या, बाधित गावांचे सर्वेक्षण करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

आमनदीचे नैसर्गिक पात्र उलट दिशेने केले वळता:

नदीच्या नैसर्गिक प्रवाहात बदल झाल्यामुळे कळमना, शिरपूर, नरसाळा, कान्हवा आदी परिसरातील शेतजमिनी व सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होत असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे.मागील वर्षी चुकीच्या नदी प्रवाहामुळे जुलै महिन्यातच पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. पांढराबोडी, खडकाडी, मकडाटोका, उक्करवाही, डोंगरगाव, पारडगाव, वाघोली या आठ तलावांमधून येणारे पाणी आम नदीत मिसळत असल्याने संपूर्ण परिसर जलमय झाला होता. अनेकांची पिके वाहून गेली, शेती खराब झाली आणि गावातील रस्ते पाण्याखाली गेल्याने जनजीवन विस्कळीत झाले होते.

विशेष म्हणजे ग्रामस्थांच्या तक्रारीनंतर जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन बैठकीत हा विषय उपस्थित झाला होता. मात्र अत्यंत गंभीर बाब म्हणजे, वेकोली प्रशासनाने या कामासाठी त्यावेळेस आणखी तीन महिन्यांचा कालावधी मागितला होता मात्र परिस्थिती वेगळीच आहे. वेकोली प्रशासन उमरेड गांधीयनि हा विषय घेत नाही त्यामुळे होणाऱ्या हिवाळी



अधिवेशनात ठामपणे आम नदीपात्र पूर्ववत करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्यात ही मागणी यावेळी करण्यात आली आहे.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचा सर्वेक्षणाचा मुद्दा

पूरस्थितीमुळे बाधित झालेल्या गावांतील हजारो हेक्टर शेतजमिनी व पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्यात आले आहेत का, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची संख्या किती आहे, तसेच त्यांना नुकसानभरपाई देण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली, याची माहिती शासनाकडून घेण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

कायमस्वरूपी उपाययोजनेची मागणी

आम नदीचे नैसर्गिक पात्र पूर्ववत करणे, नदीतील अडथळे दूर करणे आणि नदीकाठच्या गावांचे विशेष सर्वेक्षण करून भविष्यात पूरस्थिती निर्माण होऊ नये यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना राबविण्याची मागणी करण्यात आली आहे. यासाठी प्रशासन व संबंधित विभागांना आवश्यक निर्देश देऊन उपाययोजनांसाठी निधी व कालमर्यादा निश्चित करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

येत्या हिवाळी अधिवेशनात आम नदीच्या नैसर्गिक प्रवाहाचा प्रश्न उपस्थित करून वेकोलिच्या कामांमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीची शासनस्तरावर दखल घ्यावी, तसेच बाधित शेतकरी व गावांना न्याय मिळवून द्यावा, अशी अपेक्षा कळमना ग्रामपंचायतीचे सरपंच व परिसरातील शेतकऱ्यांनी आमदार संजय मेश्राम यांच्याकडे व्यक्त केली आहे.

थोडक्यात

मुसेवाडीच्या शेतकऱ्यांना शासकीय कृषी योजनांचे मार्गदर्शन



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

दत्ता मेघे फाउंडेशन, नागपूर संचालित व डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला संलग्नित नंदकिशोर जयस्वाल कृषी महाविद्यालय, दुधाळा, रामटेक यांच्या वतीने समुदाय सेवा उपक्रमांतर्गत दत्तक ग्राम मुसेवाडी येथील शेतकऱ्यांसाठी शासकीय कृषी योजनांवरील मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन २१ नोव्हेंबर रोजी करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्वर्गीय दत्ता भाऊ मेघे यांच्या जीवनकार्यावर आधारित लघु चित्रफीत प्रदर्शित करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. केविन गवळी होते, तर प्रमुख अतिथी म्हणून प्रभारी मंडळ कृषी अधिकारी श्रीमती पी. एम. मेश्राम व सहाय्यक कृषी अधिकारी श्रीमती अर्चना रेवतकर उपस्थित होत्या. मुसेवाडीच्या सरपंच श्रीमती भारती बोरजवाडे, ग्रामपंचायत अधिकारी श्रीमती शोभना परिहार व सामाजिक कार्यकर्ते दुर्गेश बरबटे यांचीही विशेष उपस्थिती होती.

प्रमुख अतिथी श्रीमती पी. एम. मेश्राम यांनी प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना (ढटऋइए), कृषी यांत्रिकीकरण योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना, भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना व नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प यांसह विविध शासकीय योजनांची माहिती देत अनुदान, लाभार्थी पात्रता, आवश्यक कागदपत्रे व अर्ज प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ चे समूह सहाय्यक निखिल अनिल बावनकर यांनीही शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. मार्गदर्शनानंतर शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांचे मान्यवरांनी निरसन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन कृषी विस्तार शिक्षण विभाग प्रमुख तथा समुदाय सेवा प्रभारी डॉ. स्वप्नील पंचभाई यांनी केले, तर आभार प्राध्यापिका आस्था राऊत यांनी मानले. शेतकऱ्यांमध्ये कृषीविषयक जनजागृती निर्माण करून शासकीय योजनांची माहिती पोहोचविणे हा उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

सदर कार्यक्रमाचे आयोजन रामगिरी कॅम्पसचे मुख्य प्रशासकीय अधिकारी श्री. अश्विन रडके यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. मनीष पांडव, प्राध्यापक विकास किरणापुरे, प्राध्यापिका आस्था राऊत यांच्या सहकार्याने करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता महाविद्यालयातील प्रथम सत्राच्या विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाला गावातील शेतकरी, ग्रामपंचायत पदाधिकारी, मान्यवर व महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

भविष्यकालीन प्रश्नांचा वेध घेणारी 'ओमेगा - बियाँड ह्यूमन' मराठी एकांकिका

२१व्या एकांकिका बहुभाषी नाट्य महोत्सवाचा दुसरा दिवस

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

कला सागरच्या वतीने आणि विदर्भ हिंदी साहित्य सम्मेलनाच्या सहकार्याने आयोजित २१व्या एकांकिका बहुभाषी नाट्य महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी देवरावजी कुबडे सेवा प्रतिष्ठान, श्रीकृष्णनगर, नागपूर प्रस्तुत भावना चौधरी दिग्दर्शित 'ओमेगा - बियाँड ह्यूमन' या मराठी एकांकिकेचे सादरीकरण झाले. भविष्यात माणसांना वैयक्तिक सहाय्यक म्हणून महिला रोबोट्सची नियुक्ती करता येईल, अशी कल्पना या एकांकिकेत मांडण्यात आली आहे. हे रोबोट्स अधिक प्रगत होऊन मानवी संवेदना ओळखू लागले, तर मानव आणि रोबोट्स यांच्यातील नाते कोणत्या टप्प्यापर्यंत पोहोचू शकते, तसेच हे रोबोट्स एखाद्या अधिक प्रगत परग्रहवासी जमातीने ताब्यात घेतल्यास मानवजातीसमोर कोणते धोके निर्माण होऊ शकतात, अशा भविष्यकालीन प्रश्नांचा वेध या एकांकिकेतून घेण्यात आला. कलाकारांच्या प्रभावी सादरीकरणाला प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



मोर हिंदी भवन परिसरातील स्व. रामगोपाल माहेश्वरी सांस्कृतिक सभागृहात आज दुसऱ्या दिवशी सॉफ्ट स्किल ट्रेनर व एनकेपी मेडिकल कॉलेज डॉ. सुरेश चारी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक मधू घाटे यांच्यासह कलासागरचे मुख्य संरक्षक व सचिव, अध्यक्ष रविशेखर गिल्लूरकर, कार्याध्यक्ष सुशील तिवारी, उपाध्यक्ष रवींद्र बिजवे, कोषाध्यक्ष डॉ. रमेश बारस्कर, सहसचिव रूपाली वंजारी आणि सविता पांडे उपस्थित होते. हंसिनी येल्लामिल्ली यांनी उत्कृष्ट भरतनाट्यम-नृत्य सादर केले. उद्घाटनपर मनोगतात डॉ. चारी यांनी कला सागरच्या २१ वर्षांच्या नाट्यप्रवासाचे कौतुक केले. इतक्या वर्षांपासून सातत्याने विविध भाषांतील कलाकारांना आपली कला सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे ही महत्त्वपूर्ण बाब असल्याचे त्यांनी सांगितले. या महोत्सवाला भविष्यात मोठे स्वरूप प्राप्त होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेंद्र हरडे यांनी केले.

किरण दमडूजी कोमले यांचे निधन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर



धरमपेठ येथील आंबेडकर नगर, बुद्ध विहार परिसरातील रहिवासी श्री. किरण दमडूजी कोमले (वय ७९ वर्षे) यांचे आज सकाळी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर उद्या, बुधवार, सकाळी ११ वाजता अंबाझरी घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

'जय जय रामकृष्ण हरी !.'च्या गजरात रंगला मनपाचा महापौर कीर्तन महोत्सव

संत सज्जनांची संगत लाभल्यास थेट दैवाशी संवाद, ह.भ.प. सोपानदादा कानेरकर महाराज यांच्या जाज्वल्य वाणीतून हरिनामाचा जागर

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

संतांची व सज्जनांची संगत लाभल्यास दैवाशी संवाद साधल्याशिवाय राहणार नाही, असे मार्गदर्शन ह.भ.प. सोपानदादा कानेरकर महाराज यांनी केले. निमित्त होते ते वैकुंठ चतुर्दशीचे औचित्य साधून मनपाद्वारे आयोजित महापौर कीर्तन महोत्सवाचे. जय जय रामकृष्ण हरी !.'च्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात महापौर कीर्तन महोत्सव सोमवारी (ता. २३) उत्साहात पार पडला. महोत्सवात ह.भ.प. सोपानदादा कानेरकर महाराज यांनी आपल्या जाज्वल्य वाणीतून हरिनामाचा जागर करीत उपस्थितांना भक्तिरसात चिंब केले.



कार्यक्रमाला दक्षिण नागपूरचे आमदार मोहन मते, महापौर निता ठाकरे, उपमहापौर लीला हाथीबेड, स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे, परिवहन समिती सभापती मंगला खेकरे, माजी आमदार सुधाकर कोहळे, माजी महापौर दयाशंकर तिवारी, क्रीडा विशेष समिती सभापती दर्शनी धवड, जलप्रदाय विशेष समिती सभापती दिव्या धुरडे, अग्निशमन व विद्युत विशेष समिती सभापती रूपाली ठाकूर, नेहरूनगर झोन सभापती सीमा ढोमणे, हनुमाननगर झोन सभापती ज्योती देवधर, शिवसेना गटनेते गणेश चार्लेवार, शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटनेते किशोर कुमेरिया, गटनेते शकील पटेल, नगरसेवक विजय (पिंटू) झलके, चंद्रकांत खंगार, शेषराव गोतमारे, मनोज साबळे, नगरसेविका मानसी शिमले, वैशाली उदापूरकर, मंगला मस्के आणि मनपा क्रीडा अधिकारी डॉ.पियुष आंबुलकर यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापौर निता ठाकरे यांनी प्रास्ताविकातून नागपूर महानगरपालिकेच्या क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात आहे. वैकुंठ चतुर्दशीच्या निमित्ताने तरुण पिढीला सनातन संस्कृतीशी जोडण्यासाठी कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याचे ठाकरे यांनी सांगितले. कार्यक्रमासाठी नगरसेवक विजय (पिंटू) झलके यांनी घेतलेल्या परिश्रमांचा उल्लेख करून त्यांनी सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांचे आभार व्यक्त केले. विशेष म्हणजे, महोत्सवानिमित्त सकाळी रांगोळी स्पर्धा आणि सायंकाळी भव्य दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी आमदार मोहन मते यांनी महापौर निता ठाकरे यांच्या पुढाकारातून दक्षिण नागपुरात वारकरी संप्रदायाला एकत्र आणण्याचे कार्य झाल्याचे सांगितले. क्रीडा विशेष समिती सभापती दर्शनी धवड यांच्या सहभागातून आयोजित अशा धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांमुळे समाजात जनजागृती आणि सांस्कृतिक मूल्यांचे संवर्धन होते, दक्षिण नागपुरातील इतर नगरसेवकांनीही अशा कार्यक्रमांचे आयोजन करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

कीर्तनातून ह.भ.प. सोपानदादा कानेरकर महाराज यांनी संतसंगतीचे महत्त्व विशद केले. संतांच्या आणि भगवंतांच्या मार्गावर चालताना स्वार्थ व परमार्थ कसा साधावा, याचा अर्थ सांगणारा अभंग त्यांनी सादर केला. संतांची व सज्जनांची संगत लाभल्यास दैवाशी संवाद साधल्याशिवाय राहणार नाही, असे प्रतिपादन त्यांनी केले. संगतीमुळे भगवंताचे दैवी रूप अनुभवता येते, तर संतांच्या मागोर्ने व शास्त्रानुसार आचरण केल्यास भौतिक जीवनालाही प्रासादिक स्वरूप प्राप्त होते, असे त्यांनी सांगितले.

भारत माता की जयचा जयघोष करण्याचे आवाहन करीत त्यांनी नागपूर महानगरपालिकेचा ह्यधनवान, कुळवान आणि चरित्रवानह्ण असा उल्लेख करून महोत्सवाच्या आयोजनाचे कौतुक केले. संत तुकडोजी महाराज यांच्या जीवनातील प्रसंगांच्या माध्यमातूनही त्यांनी संत संगतीचे महत्त्व पटवून दिले.

रांगोळी स्पर्धेत श्रीमती प्रेमा रेके प्रथम

महोत्सवानिमित्त आयोजित रांगोळी स्पर्धेत प्रेमा रेके (सांकेतिक क्रमांक २७) यांनी प्रथम, श्रीमती आराध्या मांडवकर (२९) यांनी द्वितीय, तर श्रीमती अंकिता तेटे (४५) यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. प्रोत्साहनपर पारितोषिके मयुरी वैरागडे (१२), वर्षा मेंढे (८), श्रीमती सपना भालेकर (१६), श्री. स्वप्नील नवलाखे (४७), विद्यानी जिचकार (३०), सुजाता बोडखे (६७), युवांक्षी पराले (१९), पूजा चव्हाण (२२), मीनल कुबडे (३४) आणि श्रुतिका रोकडे (३) यांना प्रदान करण्यात आली.

शेतकऱ्यांच्या जनसागराने सालेकसा तहसील कार्यालय दणाणले!

चुकीच्या पंचनाम्यांवर शेतकऱ्यांचा तीव्र संताप; नुकसानभरपाई तातडीने देण्याची तहसीलदारांकडे मागणी, पंचनाम्यातील चुका झाल्याची तहसीलदारांची कबुली; दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाई करून सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना न्याय देण्याची मागणी, शेतकरी व जनप्रतिनिधींचा आक्रमक पवित्रा

दै. सिंहवाणी वृत्त, राजू फुंडे-सालेकसा

अवकाळी पावसामुळे धान पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होऊनही अनेक शेतकरी शासनाच्या आर्थिक मदतीपासून वंचित राहण्याची परिस्थिती निर्माण झाल्याने सालेकसा तालुक्यातील शेतकऱ्यांचा संताप अखेर उफाळून आला. सोमवार, दिनांक २३ नोव्हेंबर रोजी मोठ्या संख्येने शेतकरी तहसील कार्यालयात एकत्र आले. शेतकऱ्यांच्या या जनसागरामुळे तहसील कार्यालय परिसरात प्रशासनाविरोधात तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले.

शासनाने जाहीर केलेली प्रति शेतकरी ५ हजार रुपयांची आर्थिक मदत सरसकट देण्यात यावी, तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी नुकसानभरपाई तातडीने वितरित करावी, अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली. चुकीच्या पंचनाम्यांमुळे अनेक पात्र शेतकरी मदतीपासून वंचित राहिल्याचा मुद्दा उपस्थित करून शेतकऱ्यांनी प्रशासनाला जाब विचारला.



चुकीच्या पंचनाम्यांवर तहसीलदारांची कबुली!

यावेळी शेतकरी आणि जनप्रतिनिधींनी पंचनाम्यात झालेल्या त्रुटींबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. काही कर्मचाऱ्यांनी चुकीचे पंचनामे केल्याची बाब तहसीलदारांनी शेतकऱ्यांना सांगितल्याने उपस्थित शेतकऱ्यांमध्ये अधिकच संताप व्यक्त करण्यात आला. प्रत्यक्ष शेतातील नुकसान आणि पंचनाम्यातील नोंदी यामध्ये तफावत असल्यास त्याची तातडीने दुरुस्ती करून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

शेतकऱ्यांना नुकसानभरपाई लवकर मिळावी, या मागणीवर तहसीलदारांनी सकारात्मक भूमिका दर्शविल्याचेही यावेळी सांगण्यात आले. त्यामुळे आता प्रशासन प्रत्यक्षात किती वेगाने कार्यवाही करते, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

'शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य द्या!' - मानदास बसेना

यावेळी सामाजिक कार्यकर्ते मानदास बसेना यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले की, शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देऊन कर्मचाऱ्यांनी काम करणे आवश्यक आहे. सालेकसा तहसीलमधील शेतकऱ्यांशी नेहमीच भेदभाव होत असल्याची भावना निर्माण झाली आहे. अनेकदा कर्मचारी तहसील कार्यालयात उपस्थित राहत नसल्यामुळे शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. कर्मचाऱ्यांनी सालेकसा येथे नियमित उपस्थित राहून जनभावनेचा आदर करावा आणि नागरिकांची कामे वेळेत पूर्ण करावीत. पंचनाम्यांमध्ये झालेल्या चुका तातडीने दुरुस्त करून त्यासाठी जबाबदार असलेल्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी. तसेच सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट नुकसानभरपाई मिळाली पाहिजे, अशी ठाम मागणी त्यांनी केली.

शेतकरी हितासाठी एकजुटीचा निर्धार!

या आंदोलनात्मक उपस्थितीदरम्यान शेतकरी वर्ग आणि जनप्रतिनिधींमध्ये तीव्र जनाक्रोश पाहायला मिळाला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर प्रशासनाने दुर्लक्ष केल्यास भविष्यातही एकजुटीने आवाज उठविण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

भारतीय बौद्ध महासभा सालेकसा टीमची बौद्धगयाला सदिच्छा भेट; प्रज्ञाभूमी ट्रस्टतर्फे सर्वांचा गौरव



दै. सिंहवाणी वृत्त, राजू फुंडे-सालेकसा

भगवान गौतम बुद्ध आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने भारतीय बौद्ध महासभा सालेकसा येथील उपासक-उपासिकांच्या टीमने ऐतिहासिक बौद्धगया येथे सदिच्छा भेट दिली. प्रज्ञाभूमी ट्रस्ट, बौद्धगया यांच्या वतीने डोंगेश्वरी पर्वतासमोरील खरेदी करण्यात आलेल्या जमिनीवर भव्य भारतीय बौद्ध विहार, प्रशिक्षण केंद्र, बुद्ध भिक्खू संघासाठी निवास व्यवस्था तसेच बौद्ध उपासक-उपासिकांसाठी निवासाची सुविधा उभारण्यात येणार आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या अनुषंगाने प्रज्ञाभूमी ट्रस्टचे सदस्य तथा नागार्जुन बौद्ध विहार सालेकसा येथील अध्यक्ष डॉ. राजेंद्र बडोले यांच्या उपस्थितीत सालेकसा येथील बौद्ध बांधवांनी या परिसराला भेट दिली. यावेळी भारतीय बौद्ध महासभा सालेकसाच्या महासचिव प्रा. शालिनीताई बडोले, सालेकसा शहर अध्यक्ष भिवराम भास्कर, उपाध्यक्ष अनिल तिरपुडे, विजय जांभुळकर, अजय साखरे, संतोष मेश्राम, सिद्धार्थ साखरे, अंजली साखरे, प्रियंका साखरे, बबीता तिरपुडे, माया जांभुळकर, छाया भास्कर, खिलेश बडोले, समयन साखरे, प्रियांशू साखरे यांच्यासह अनेक उपासक-उपासिका उपस्थित होते.

या भेटीदरम्यान सर्वप्रथम महाबोधी महाविहार येथे भगवान गौतम बुद्धांचे दर्शन घेऊन पवित्र बोधिवृक्षाला नमन करण्यात आले. त्यानंतर सुजाता खीर मंदिर, सुजाता महाल तसेच विविध देशांतील मॉनेस्ट्री, प्रार्थनास्थळे आणि ऐतिहासिक बौद्ध स्थळांना भेट देऊन माहिती जाणून घेण्यात आली.

संत गोपाल बाबांच्या परंपरेचा जागर; रामटेकच्या ४५ व्या भव्य शोभायात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद

५ लाख ५८ हजारांची पारितोषिके; धार्मिक, ऐतिहासिक आणि सामाजिक देखाव्यांनी वेधले लक्ष



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

संत गोपाल बाबा यांनी सुरू केलेल्या ऐतिहासिक परंपरेचा वारसा जपत रामटेकच्या ४५ व्या भव्य शोभायात्रेचा शुभारंभ २३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी अठराभुजा गणेश मंदिरातून उत्साहात झाला. महाआरती आणि संत गोपाल बाबा यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून शोभायात्रेला सुरुवात करण्यात आली. आकर्षक झाकी, स्वागतद्वारे आणि रांगोळ्यांनी सजलेल्या शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी राज्यमंत्री आशिष जैस्वाल, खासदार शामकुमार बर्वे, माजी मंत्री राजेंद्र मुळक, आमदार कृपाल तुमाने, कॉग्रेस नेते अमोल देशमुख, नगराध्यक्ष बीकेंद्र महाजन, उपाध्यक्ष आलोक मानकर, रमेश कारामोरे यांच्यासह भारतीय जनसेवा मंडळाचे अध्यक्ष चंद्रपाल चौकसे, महासचिव डी. मल्लिकार्जुन रेड्डी, शोभायात्रा समिती अध्यक्ष राजेश किंमतकर, कैलासपुरी महाराज नागार्जुन, सुखदेव उरकुडे महाराज, उपविभागीय अधिकारी प्रियेश महाजन, तहसीलदार रमेश कोळप्पे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी रमेश बरकतेपोलिस निरीक्षक राजेश थोरात उपस्थित होते.



संत गोपाल बाबांनी सुरू केलेली शोभायात्रा अखंड सुरू राहावी. ही शोभायात्रा कलाकारांना प्रोत्साहन देणारी असून त्यांच्या कलाकृतींतून धार्मिक, ऐतिहासिक आणि सामाजिक विषयांचे दर्शन घडते, अशी भावना मान्यवरांनी व्यक्त केली. वंदाच्या शोभायात्रेत ट्रक-ट्रेलरवरील ८, ट्रॅक्टरवरील १० आणि पायदळ झाकी सहभागी झाल्या. एकूण ५ लाख ५८ हजार ५११ रुपयांची नगद पारितोषिके देण्यात आली.

ट्रॅक्टर गटात रामधाम मनसरच्या गणेश अवतारला प्रथम, सचिन बावनकुळे यांच्या लेकीच्या संरक्षणासाठी बापाची धडपडला द्वितीय, तर रोशन चाफले यांच्या आई अंबाबाई जोगवा या झाकीला तृतीय पुरस्कार मिळाला. दुसऱ्या ट्रॅक्टर गटात बाळा बडवाईक यांच्या कामधेनू गोमातेला प्रथम, शनिवारी वॉर्डच्या सीताहरणाला द्वितीय आणि शंकर पोटभरे यांच्या संजीवनी बुटीला तृतीय पुरस्कार मिळाला. पायदळ गटात हेमंत गुजर यांच्या शांती प्रस्तावला प्रथम, रामसेतूला द्वितीय आणि नरसिंह अवतारला तृतीय पुरस्कार मिळाला. स्वागतद्वारांमध्ये महाकाल द्वार प्रथम आणि शिव द्वार द्वितीय ठरले. शहराच्या सांस्कृतिक एकात्मतेचे प्रतीक असलेल्या या शोभायात्रेचा समारोप नगर परिषद मैदानावर झाला.

झोभायात्रा यशस्वीतेकरीता चंद्रकांत ठक्कर, शंकरराव चामलाटे, सुभाष बघेले, नत्थू घरजाळे, धनराज काठोके, शेखर बघेले, विनायक डांगरे, ऋषीकेश किंमतकर, हुकुमचंद बडवाईक, मोहन कोठेकर, राहुल कोठेकर, राहुल गुंडरे, मोनू रघुवंशी, तपेश ठक्कर, शुभम बिसमोगरे, सोमेश तिवारी स्वप्नील दियेवार, सोमेश तिवारी, रजत भजभिये, लला जैन, डॉ. राजेश ठाकरे, संजय मूलमुले, विक्रम बिस्मोगरे, उमेश पटले, बबलू दुधबर्वे, सागर धावडे, ईश्वर हांडे, रवी बावनकुळे, धरमेश भागलकर. अजय मेहरकुळे, शेखर पाटील, अर्थव किंमतकर, अनिकेत केळवदे, अँड सजिव खंडेलवाल, अनिल भोरसले, दयानंद रेवतकर, आकाश ढोबळे, अनिकेत केलवडे, गोलू महाजन, निर्भय घाटोळे, सहित विविध समित्यांनी काम केले. प्रस्तावना राजेश किंमतकर, धन्यवाद सुभाष बघेले, कार्यक्रम संचालन - राजेश कुमरे, ध्वनी व्यवस्था लकी नागेश्वर यांनी केली.